आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २१ जून २०२३



गंगाप्रसाद खरात

# योगः कर्मसु कौशलम्

आधुनिक केसरी


**आज कालचे धकाधकीचे जीवन, नव्या पिढीची नवी दृष्टी, बदलता काळ, बदलते विचार, बदलती मने आणि बदलती जीवनशैली इत्यादींचा विचार केला असता एक गोष्ट निश्चित लक्षात येते, ती म्हणजे जरी आपण शास्त्रीय - तांत्रिक इत्यादी क्षेत्रात पुढे पाऊल टाकलेले असले तरी जीवनमूल्ये मात्र गमावून बसलो आहोत. त्याचे कारण म्हणजे जीवनाचा अर्थ नीट समजावून न घेता आपण मृगजळाप्रमाणे मिळेल त्यामागे धाव घेत आहोत. बाह्य जगात विकास घडत असताना आंतरिक जगातही तो विकास घडणे आवश्यक आहे. आपल्या आंतरिक अस्तित्वाविषयी सतत चेतन असणे याला अध्यात्मिक प्रगती म्हणतात. ही बाह्य भौतिक चेतनेपेक्षा वेगळी असते. संपूर्ण ब्रम्हांडाची निर्मिती पृथ्वी, अग्नी, वायू, आकाश व जल या पाच तत्त्वांनी झालेली आहे. या पाच तत्त्वांचा समावेश आपल्या शरीरामध्ये आहे. पण या पाच तत्त्वांमध्ये एक तत्त्व असेही आहे ते म्हणजे ऑक्सिजन, जे की त्या सगळ्यांमध्ये अस्तित्वात आहे आणि तो ऑक्सिजन म्हणजेच प्राण किंवा श्वास होय. भारतीय प्राचीन ग्रंथांमध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, वित्त (धन), मित्र , भार्या (पत्नी) इत्यादींची पुनर्प्राप्ती शक्य आहे, परंतु या मनुष्य योनीची पुनर्प्राप्ती दुर्लभ आहे.**

आपल्या या शरीररुपी मनुष्य जीवनाला सार्थ बनविण्यासाठी, आपल्याला शारीरिक, मानसिक व भावनिक रूपाने मजबूत होण्यासाठी तसेच आपल्या सर्वांगीण विकासासाठी शरीराची आंतरिक मलिनता दूर करणे गरजेचे आहे. नैतिकता, जीवनमूल्ये व भारतीय संस्कृती, सभ्यता आणि गौरवशाली भारताची पुनर्स्थापना यासाठी 'योग' एक ब्रम्हास्त्र आहे.

योगामुळे संस्कार मजबूत होतात " अथः योगानुशासनम" म्हणजे योगाने आमच्या शरीराला अनुशासन प्राप्त होते. उत्साह वाढतो, व्यवहाराच्या शुद्धी सोबत हळूहळू ,कर्तव्य -अकर्तव्य याचाही बोध होतो. मग आम्ही राग -द्वेष, सुख -दुःख, फायदा- तोटा आणि जय- पराजयापासून कोसो दूर राहू शकतो , ही उत्तम अवस्था योगामुळेच प्राप्त होते. जिथे आयुर्वेद शारीरिक स्वास्थ देते, तिथे योग मानसिक स्वास्थ मिळवून देते. शरीर, मन आणि आरोग्य या तिघांमध्ये घनिष्ठ संबंध असून मनाचा आपल्या शरीरावर कळत - नकळत प्रभाव पडत असतो. मनाला नियंत्रित करण्यासाठी आमच्या ऋषीमुनींनी काही योगिक क्रियांची रचना केली आहे. विज्ञानाने सुद्धा आता मान्य केले आहे की, मनामध्ये निर्माण होणाऱ्या भावना आणि विचारांचा आमच्या सवयी, राहणीमान ,खाणे- पिणे आणि शरीर यावर अत्यंत प्रभाव पडत असतो. शरीरातील हार्मोन्स व मनातील भावना यांचा जवळचा संबंध असल्यामुळे या दोन्हींच्या असंतुलनाने शरीर रोगग्रस्त होत असते. योगाच्या माध्यमाने आपण आपले आंतरिक जीवन संयमित आणि संतुलित करू शकतो. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये मनुष्य जीवनाचे सर्वतोपरी उद्देश चार पुरुषार्थ- धर्म , अर्थ, काम आणि मोक्षाची प्राप्ती होय. या सगळ्यांना आपण निरोगी शरीरामुळेच मिळवू शकतो. आरोग्याप्रती जागरूक साधकांसाठी योगसाधना एक रामबाण उपाय ठरू शकतो. यामध्ये कोणत्याही प्रकारची शंका नाही. नियमित योग अभ्यासामुळे श्वास- प्रश्वासाची प्रक्रिया नियंत्रित होते. शरीराला नियंत्रित ठेवणाऱ्या तीनदोषांचे (वात -कफ- पित्त ) संतुलन राहते. योग विद्या ही अशी साधना आहे की, ज्याद्वारे व्यक्ती सुख, शांती आणि आनंद प्राप्त करू शकतो. नियमित योगाभ्यास केल्यास मनात बदल होण्याची प्रक्रिया सुरू होते. सर्वप्रथम आपल्या मनाचा आरसा स्वच्छ केला तरच त्यात स्वतःचा चेहरा स्पष्ट दिसेल. मनाच्या विक्षिप्त व चंचल अवस्था रजोगुणांतर्गत येतात. मनाची सुस्त, निष्क्रिय अवस्था तमो गूण प्रधान असते. अशा अवस्थेत जर तुम्ही ध्यान करायला बसलात तर झोपून जाल. म्हणून आपले लक्ष शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक आणि वैचारिक स्तरावर उत्तरोत्तर प्रगती करण्याचे असले पाहिजे. आपण या पृथ्वीवर जिथे कुठेही, कसेही असा तुमच्या दिनचर्येमध्ये योगाभ्यासाला नियमित स्थान द्या. त्यासोबतच जीवनात घडणारी कोणतीही घटना तुमच्या मनाला चुकीच्या पद्धतीने प्रभावित करणार नाही, याची नेहमीसाठीच काळजी घेतली तर आपल्या शरीराची दशा आणि जीवनाची दिशा निश्चितच बदलता येऊ शकते.










विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

हेमंतदांचा हा संगीताला आपले आयुष्य वाहून घेण्याचा निर्णय योग्य ठरला हे पुढे काळाच्या कसोटीवर त्यांनी सिद्ध केलं. हेमंत मुखोपाध्याय आपल्या पुढील आयुष्यात रसिकांचा लाडका हेमंतकुमार, हेमंतदा बनला.
संगीत जरी हेमंतदांच्या रोमरोमात होते आणि ईश्वरदत्त प्रतिभेची देणगी लाभली होती, तरी पुढील वाटचालीसाठी शास्त्रीय संगीत शिकणे आवश्यक होते. उस्ताद फैयाज खान यांच्या शिष्याकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे रीतसर शिक्षण घेतले. त्यांनी अनेक बंगाली आणि हिंदी चित्रपटांना संगीताचा साज चढवला. गायक म्हणून गाणीही गायली. हेमंतदांच्या तोडीचा कोणी गायक बंगाली चित्रपटसृष्टीत झाला नाही असे त्यांच्याबद्दल बोलले जाते. मुंबईला सुप्रसिद्ध संगीतकार यांच्या सहवासात आल्यावर हेमंतदांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आपले पाय रोवायला सुरुवात केली. जन्मजात संगीत आणि गायकीची प्रतिभा लाभलेले हेमंतदा आपल्या कर्तृत्वाने हिंदी चित्रपटसृष्टीत लवकरच एक प्रतिष्ठित संगीतकार म्हणून उदयास आले. त्यांनी गायिलेली आणि संगीतबद्ध केलेली गाणी तरुणाईच्या मनात रुंजी घालत असत. त्या गीतांमध्ये तरुणाईला जणू आपल्याच प्रेमाच्या भावना व्यक्त झाल्या आहेत असे वाटे. तुम पुकार लो, तुम्हारा इंतजार है..., जाने वो कैसे लोग थे..., ये नयन दरे दरे, ना तुम हमे जानो यासारखी त्यांची गाणी तरुणाईच्या ओठांवर होती. ' तुम पुकार लो ...' या गाण्याची सुरुवात हेमंतदांनी ' हमिंग साउंड ' ने केली आहे. ही त्यांची अनोखी सुरुवात कमालीची लोकप्रिय तर ठरलीच पण पुढे हेमंतदांच्या गाण्यांचे एक वैशिष्ट्य बनली. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर ती हेमंतदांची ' सिग्नेचर स्टाईल ' बनली. ' ममता ' चित्रपटातलं त्यांनी लतादीदींबरोबर गायिलेले ' छुपा लो दिल में यूं प्यार मेरा...' हे गीतही रसिकांनी डोक्यावर घेतलं. सुप्रसिद्ध संगीतकार सलील चौधरी यांनी हेमंदांच्या गाणी आणि आवाजाबद्दल फार सुंदर उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, ' परमेश्वराला जर कधी गायची इच्छाच झाली, तर तो हेमंतदांच्या आवाजात गाईल. ' लतादीदी हेमंतदांबद्दल बोलताना म्हणाल्या होत्या, ' हेमंतदांचं गाणं म्हणजे मंदिरात बसून एखादा साधू किंवा पुजारी गाणं गातो आहे असं वाटतं. असा हा भावविभोर करणारा पवित्र स्वर आहे ! ' थोडक्यात सांगायचं तर हा ईश्वरी आवाज आहे. १९६२ सालची गोष्ट आहे. लतादीदी प्रचंड आजारी होत्या. त्यांना डिप्थेरिया नावाचा घशाचा आजार झाला होता.



## आनंदी पहाट

# व्यक्तीची ओळख तिच्या विचारांवरून होते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अनेकदा आपले मन जुने

सोडायला, विसरायला तयार नसते, तसेच ते नव्याची नवलाई देखील अनुभवू पाहत असते. खरे तर, इथेच आपल्यातील निवड कौशल्याचे कसब दिसून येत असते. आपले अंतर्मन सौदर्याच्या संकल्पनांना नवी दिशा मिळवून देण्याच्या प्रयत्नात असते. नवे काहीतरी हवे असे म्हणणारे एक मन एका दिशेने, तर जुने ते सोने म्हणणारे दुसरे मन त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने विचार करत असते. असे जरी असले तरीही, प्रयोगशील मनाला नावीन्याची अनुभूति हवी असते, मग ते नव्याचाच अंगीकार करते. अगदी प्राचीन काळापासून आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसे विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्ररंभापुरते निमित्तच ठरत असते. आयुष्याच्या प्रवासात सोबत हवी असते, ती विचारांचीच.



आधुनिक केसरी

### सुखाचा विसावा | हरिपाठ ||

नाही ओळखला | विकारांचा मारा ||
पापाचा पसारा | भोवताली ||१||
क्षणिक सुखाला | भाळला हा जीव ||
मृगजळी ठाव | नाही कोठे ||२||
संसाराचा भार | थकलो वाहून ||
गर्दभा समान | वाया गेला ||३||
ज्ञाना-तुका सांगे | मायेचा पसारा ||
अंतरी मोगरा | गंधाळला ||४||
आता तरी थोडा | जाग माझ्या जीवा ||
सुखाचा विसावा | हरिपाठ ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# नित्यनेम म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

नित्यनेम म्हणजे काय ? नित्याचा जो नियम तो खरा नित्यनेम होय. नित्य कोण ? जो कधीही बदलत नाही तो. याचा अर्थ, जो पूर्ण शाश्वत आहे तोच खरा नित्य होय. म्हणून नित्य म्हणजे भगवंत समजावा. त्याचा नियम करायचा म्हणजे काय करायचे ? नियम करणे याचा अर्थ नियमन करणे, निग्रह करणे, वश करून घेणे, स्वाधीन ठेवणे हा होय. आपले मन भगवंताच्या स्वाधीन करणे, त्याच्या ठिकाणी ते नेहमी ठेवणे याचे नाव नित्यनियम होय. आजच्या आपल्या मनाच्या अवस्थेमध्ये ते सर्वस्वी भगवंताच्या स्वाधीन करता येत नाही; आणि देह हा जड, अशाश्वत असल्यामुळे देहाने, नित्य आणि शाश्वत अशा भगवंताचा नियम घडणे शक्य नाही. म्हणून देहाने घेता येत असून देहाच्या पलीकडे असणारे, आणि सूक्ष्म असल्यामुळे भगवंताशी शाश्वत संबंध असणारे, असे भगवंताचे नाम अखंड घेणे हा आपला खरा नित्यनियम आहे. इतर सर्व गोष्टी, शास्त्राची बंधने, पोथी वगैरे वाचणे, स्नानसंध्यादि नित्यकर्मे वगैरे पाळावी पण त्याचा हट्ट वा आग्रह असू नये. कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे



नाम मात्र सोडू नये. एवढाच हट्ट क्षम्य आहे. शुद्ध भावनेने नाम घेतले की भगवंत दर्शन देतो. शुद्ध भावनेचे फळ फार मोठे आहे. पुष्कळ वेळा गरीब आणि अशिक्षित लोकच या बाबतीत श्रेष्ठ असतात. आपण नाम घेत जावे. नामाने भावना शुद्ध होत जाते. खरे म्हणजे, मनुष्याला जिवंत राहण्यासाठी हवेची जितकी जरुरी आहे तितकीच, किंबहुना त्याहूनही जास्त जरुरी, परमार्थामध्ये भगवंताच्या नामाची आहे. भगवंताच्या नामाशिवाय न राहण्याचा संकल्प प्रत्येक माणसाने केला पाहिजे. भगवंत हट्टाने किंवा उगीच केलेल्या कष्टाने साध्य होत नाही. तो एका प्रेमाने वश होतो. प्रेमामध्ये हट्ट आणि कष्ट झाले तर शोभतात, आणि हिताचे होतात. आपण भक्तांचे प्रेम न पाहता त्यांचा हट्ट आणि कष्ट तेवढे बघतो. जो मनुष्य साडेतीन कोटी रामनामाचा जप करील त्याला भगवंताच्या प्रेमाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही. शंका या फार चिवट असतात, त्या मरता मरत नाहीत. शिवाय, काही शंका आचरणाने आणि अनुभवानेच नाहीशा होतात. म्हणून, मनात शंका असल्या तरी नाम सोडू नये. सतत नाम घेत गेल्याने मन स्वच्छ होत जाते, आणि सर्व शंका आपोआप विरून जातात. लंकेमध्ये रावणाच्या बंदिवासात अशोकवनात सीता असताना, तिच्या सान्निध्याच्या प्रभावामुळे तिथली झाडे, पक्षी, दगड या सर्वांना रामनामाचे प्रेम लागले होते, असे वर्णन आहे. रामनामाचे प्रेम आणि भगवंताचे प्रेम ही दोन्ही एकच आहेत. नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे ह्यातच जीवनाचे सर्वस्व आहे. **आजचे बोधवचन आहे -१५९. ध्रुवासारखी नामावर निष्ठा पाहिजे. प्रत्यक्ष भगवंत समोर आले, तरी त्याने नाम सोडले नाही. श्रीराम समर्थ**

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**अमृतकुम्भहस्तां त्वां कान्तिमतीं प्रभावतीम्| अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम्|| २५ || हातामध्ये अमृतकुंभ धारण करणाऱ्या, कान्तीमती, प्रभावती अशा तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**अज्ञानी स्वामिनि बने,
रहे सदा शिरताज ।
भक्तन के पग तर रहे, कर सेवा भल आज
।।२२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/२२**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
माया अज्ञानी जीवांची स्वामिनी होऊन त्यांच्या शिरावर सतत मुकुट बनून राहाते आणि आता ज्ञान झाल्यावर भक्तांच्या पायाशी राहून त्यांची उत्तम प्रकारे सतत सेवा करते.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी



आतापर्यंत पंचभूताच्या मिश्रणाचा विषय पण तो विश्वरचना होण्याच्या पूर्वीचा आहे. हे अफाट विश्व निर्माण होण्यापूर्वी विश्वाच्या पलीकडे फक्त मूळमाया होती. हे द्रुष्य विश्व अस्तित्वात नव्हते तेव्हा केवळ परब्रम्ह व मूळमाया हे फक्त अस्तित्वात होते. आपण आज पहातो त्या दिसण-या मायेचा सगळा विस्तार मूळमायेच्या अलीकडचा आहे. आपल्याला संस्कृती चं फार मोठं वरदान लाभलं आहे. तेव्हा ही संस्कृती समजावून घेण्यासाठी पुढील काही विषय हाताळावे लागतील. केवळ मूळमाया होती त्यावेळी सात आवरणे असणारे हे प्रचंड ब्रम्हांड झाले नव्हते. माया व अविद्या यांची गल्लत नव्हती.पंचमहाभूते, अहंकार, महतत्व मिळून सात आवरणे मानतात. ब्रम्हा,विष्णु,महेश,प्रुथ्वी,मेरूपर्वत,सातसमुद्र,यापैकी मेरू पर्वत हा पुराणातील प्रसिद्ध, स्थिर व सर्वोच्च सोन्याचा पर्वत आहे. सर्व ग्रह त्याच्या भोवती फिरताना दिसतात. प्रुथ्वी च्या भोवती सात समुद्राचे आवरण आहे. त्याच्या पलीकडे क्षीरसागरात भगवान विष्णु लक्ष्मीमातेसह विराजमान आहेत. ते हजार फण्या असलेल्या शेषावर विराजमान आहेत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**अनुगतुं सतां वर्त्म कृत्स्नं यदि न शक्यते ।
स्वल्पमप्यनुगन्तव्यं मार्गस्थो नावसीदति ॥
स्पष्टीकरण - प्रत्येक माणसाने सज्जनांचा मार्ग चोखाळावा हे चांगले. कारण त्या मार्गात धोके नसतात. पण व्यवहारात सज्जनांचा मार्ग सर्वार्थाने चोखाळणे शक्य नसते. तरीही शक्य तेवढे त्याच मार्गाने जावे. अशाने झाला तर फायदाच होतो; नुकसान कधीच होत नाही.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

बुधवार, २१ जून २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२७८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 21 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-278 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

## चर्चेतली बातमी

## जानेवारीत राम मंदिर भाविकांसाठी खुले

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** अयोध्येतील राम मंदिर जनतेसाठी कधी खुलं होणार याबाबत अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यातच आता अयोध्येतील राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठेची तारीख जाहीर झाली आहे. राम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी एबीपी न्यूजला सांगितले की, 15 जानेवारी 2024 ते 24 जानेवारी 2024 दरम्यान राम मंदिरात श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होऊ शकते. प्राणप्रतिष्ठेच्या शेवटच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण पाठवले जाईल, असे नृपेंद्र मिश्रा यांनी सांगितले. प्राणप्रतिष्ठेनंतर राम मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले केले जातील, असेही ते म्हणाले. मिश्रा पुढे म्हणाले की, 24 ते 25 जानेवारी 2024 पर्यंत सर्वसामान्य भाविकांना मंदिरात दर्शन घेता येणार आहे. अयोध्येसाठी हा फार मोठा उत्सव असेल. देशभरातील काही ठिकाणी हा कार्यक्रम व्हर्चुअली दाखवला जाईल. परदेशातील भारतीय दूतावासांमध्ये प्राणप्रतिष्ठा लाईव्ह पाहता यावी, यासाठी तयारी सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान राम मंदिरातील गाभाऱ्याच्या मुख्यद्वारावर सोन्याचे कोरीव काम असणार आहे. तसंच मंदिराचा 161 फुटांचा कळसालाही सोन्याचे आच्छादन असेल. अयोध्येतील राम मंदिराचा पहिला टप्पा 30 डिसेंबरपर्यंत पूर्ण होणाार असल्याची नृपेंद्र मिश्रा यांनी दिली. 30 डिसेंबर 2023 पर्यंत पहिला टप्पा पूर्ण करण्याच निर्णय ट्रस्टने घेतला आहे. पहिल्या टप्प्यात ग्राउंड फ्लोअरचे पाच मांडव पूर्ण करण्यात येण्यार आहे. यामध्ये एक प्रमुख गर्भगृह असणार ज्यामध्ये भगवान रामाच्या मूर्तीची स्थापना केली जाणार आहे. या पाच मांडवाच्या निर्मितीसाठी जवळपास 160 खांब असणर आहे. तसेच आयकॉनोग्राफीचे काम देखील लवकर पूर्ण कण्यात येणार आहे.

# सरकारमध्ये मंत्रिमंडळ विस्ताराची क्षमता नाही

## पत्रकार परिषदेत आमदार बच्चू कडू यांचा घणाघात

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती : शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सध्याच्या घडीला मंत्रिमंडळ विस्तार करण्याची क्षमताच नाही. तसेच भाजपसोबत गेलेल्या सर्व 50 आमदारांना फक्त विरोधकांकडून त्रास दिला जातो, असे नाही. तर भाजपकडूनही काही जणांकडून त्रास दिला जात आहे. विरोधकांकडून 50 खोक्यांचा आरोप करुन टीका केली जात आहे. तशीच टीका मित्र पक्षाच्या काही जणांकडूनही करण्यात आली, असे म्हणत प्रहार पक्षाचे आमदार बच्चू कडू यांनी पत्रकार परिषदेत सरकारवर घणाघात केला.**



यावेळी पुढे बोलताना आमदार बच्चू कडू म्हणाले की, राज्यात सत्तांतर घडवून आणल्यानंतर गेल्या वर्षभरात घडामोडी पाहिल्यात तर कुभी खुशी, कभी गम सारखी परिस्थिती आहे. काही निर्णय खरंच चांगले घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला दिव्यांग मंत्रालय दिले. याचा मला आनंद आहेच. पण सरकारने शेतकऱ्यांसाठी घेतलेले निर्णय फार महत्त्वाचे आहेत. सरकारने शेतकऱ्यांसाठी 2 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त भरपाई दिली आहेत. तसेच आताही 1500 कोटींची भरपाई दिली. एकंदरीत आपण सात ते आठ हजार कोटींवर चाललो, असेही बच्चू कडू म्हणाले.

महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढी मोठी रक्कम नुकसान भरपाई म्हणून या सरकराने दिलेली आहे.

कधीही आणि कुणालाही उपलब्ध होईल असा मुख्यमंत्री राज्याला मिळाला आहे. कदाचित हा उठाव झाला नसता तर मुख्यमंत्री इतक्या स्थानिक पातळीवर येऊन काम करु शकतो हे महाराष्ट्राच्या जनतेला दिसलं नसतं. ही मोठी उपलब्धी आहे, असा दावा बच्चू कडू यांनी केला.

50 आमदारांची गळचेपी झालेली आहे. कारण विरोधक 50 खोके घेतले म्हणून आरोप करत आहेत. तर मित्र पक्ष भाजपच्या काही जणांकडून त्रास व्हायला लागला आहे. आता माझ्या मतदारसंघात आमदार रवी राणा यांनी खोके घेतले म्हणून आरोप केला. त्यानंतर आम्ही आवाज उठवला त्यावर भाजपकडून जसे सहकार्य पाहिजे होते तसे त्याप्रमाणात मिळाले नाही. 50 आमदारांना डिवचले जाऊ नये. त्यांच्या योगदानातून आपण सत्तेवर आलो याचा विसर पडला की काय? हा एक मोठा फरक जाणवतोय, असे बच्चू कडू यांनी सांगितले.मंत्रिमंडळ विस्ताराला वर्षभर वेळ लागणार नाही. विस्ताराच्या दुसऱ्या फेरीत मंत्रिमंडळाची निवड होईल, असे मला वाटले होते. पण विस्तार झाला नाही. हे दुर्दैव असले तरी आम्ही त्यामुळे नाराज आहोत, असे काही नाहीय. मंत्रिमंडळ विस्तार होईल. नाही झाला तरी पर्वा नाही. मला असे वाटते की, आता मंत्रिमंडळ विस्तार हा 2024 नंतरच होईल. ती क्षमता सध्या सरकारमध्ये नाहीय, असे स्पष्ट वक्तन्य बच्चू कडू यांनी केले.

### भाजपच्या मंत्र्यांकडून विकासकामांना ब्रेक

भाजपच्या काही मंत्र्यांकडून विकास कामे थांबवली जात आहेत. ते व्हायला नको, असे मला वाटते. कारण सन्मान बरोबरीने देणे गरजेचे आहे. असे होऊ नये. कारण एवढा मोठा त्याग करुन, स्वत:ची बदनामी करुन, कारण आमदारांची खूप बदनामी झाली. विरोधकांनी नको तेवढी बदनामी केली. अशा परिस्थितीत तिकडून मारा सुरु असताना इकडूनही झोडपा मारत असतील तर त्या 50 आमदारांनी कुठे जायचे? त्यावरही लक्ष देणे फार गरजेचे आहे, असे बच्चू कडू म्हणाले.



रथयात्रा मंगळवारपासून सुरू झाली आहे. भारतातील कोट्यवधी भाविकांसाठी ही यात्रा श्रद्धेचे स्थान आहे. याच ऐतिहासिक रथयात्रेचं महाराष्ट्र कनेक्शनही आहे. मराठा साम्राज्याचा भाग असलेल्या नागपूरच्या भोसले राजघराण्याचा जगन्नाथ पुरी मंदिराशी आणि तिथल्या रथयात्रेशी खास संबंध राहिला आहे. ओडिशामधील पुरी येथील जगन्नाथ मंदिरातून ऐतिहासिक रथयात्रा निघते. यामध्ये दरवर्षी लाखोंच्या संख्येने भाविक सहभागी होतात.

# गो तस्करांच्या हल्ल्यात गोरक्षकाचा मृत्यू

## चार आरोपींची ओळख पटली

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** किनवट तालुक्यातील इस्लापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गो तस्करांनी केलेल्या हल्ल्यात एका गोरक्षकाचा मृत्यू झाला. तर या हल्ल्यात सहा जण जखमी झाले. काल रात्री साडेअकराच्या सुमारास मलकजाम गावाजवळ ही घटना घडली. घटनेनंतर या भागात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. किनवट तालुक्यातील शिवणी आणि चिखली गावातील सात गोरक्षक तेलंगणा राज्यात एका कार्यक्रमासाठी गेले होते. परत येताना त्यांना अप्पाराव पेठजवळ पांढऱ्या रंगाची पिकअप बोलेरो दिसली. त्यात गोवंश असतील, असा संशय या तरुणांना आला. त्यांनी त्या गाडीचा पाठलाग सुरू केला. पुढे मलकजाम पुलावर त्यांनी बेलोरो गाडी अडवली. गाडी तपासणीसाठी शेखर रापेल्ली आणि महेश कोंडलावार हे दोघे उतरले. तेव्हा बोलेरो गाडीतील चार जणांनी अचानक हल्ला केला. नंतर दुचाकीवरदेखील सहा ते आठ जण आले. या सर्वांनी लाठी-काठी, दगड तसेच चाकूने हल्ला केला. यात शेखर रापेल्ली या तरुण ठार झाला. चार जण गंभीर जखमी झाले, तर दोघांना किरकोळ दुखापत झालीय. यातील चार जखमीना नांदेडला उपचारासाठी हलवण्यात आले. हे सर्व तरुण गोरक्षणाचे काम करायचे. सर्व जण विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते आहेत. या प्रकरणी जखमी तरुण संतोष पेंटेवार याच्या फिर्यादीवरून इस्लापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चार आरोपींची ओळख पटल्याचे पोलिसांनी सांगितले. उर्वरित आरोपींचा शोध सुरु आहे.

### शिवणी, चिखलीत तणावाची स्थिती

या घटननंतर इस्लापूर, शिवणी, चिखली गावात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे नांदेड पोलिसासह केंद्रीय राखीव पोलीस दल आणि जलद कृती दलाचे पथक तैनात करण्यात आले. दरम्यान आरोपींना अटक झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही. अशी भूमिका घेत गावकरी आणि हिंदुत्वादी संघटनांनी शिवणी येथे रास्ता रोको केलाय.

# कन्नड येथे आज स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे अकरावे पुष्प

## 'योग व विषमुक्त शेती' विषयावर शिवाजी महाविद्यालयात अजय जाधव यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी ( काकाजी ) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू



असलेल्या व्याख्यानमालेचे अकरावे पुष्प कन्नड येथील शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार प्राप्त अजय जाधव हे 'योग व विषमुक्त शेती' या विषयावर गुंफणार आहेत. बुधवार 21 जून रोजी सकाळी 7.30 वाजता





शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय येथे होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले यांची उपस्थिती राहणार आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी ( काकाजी ) यांच्या स्मृत्यर्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व शिवाजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक प्रा. डॉ. प्रकाश खेत्री व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.

# आसाममध्ये अतिवृष्टी; शेतीचे मोठे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठे पाऊस पडत आहे तर कुठे उन्हाचा चटका जावत आहे. अशातच आसाममध्ये मात्र मुसळधार पाऊस सुरु आहे. काही भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळं तेथील नागरिकांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. पूरस्थितीमुळे आसाममधील अनेक भागात गावं, शहरांसह शेती पाण्याखाली गेली आहे. त्याचबरोबर अनेक नद्या धोक्याच्या पातळीवरुन वाहत आहेत. 30 हजार लोकांना या पूरस्थितीचा फटका बसला आहे. आसाममधील 142 गावे पाण्याखाली आहेत. तर 1 हजार 510.98 हेक्टर शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. आसाममधील अनेक भागात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. याचा मोठा फटका तेथील नागरिकांना बसला आहे. भारतीय हवामान विभागाने आसामसाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे.

# नीलेकणी यांची देणगी

आधुनिक केसरी

इन्फोसिसचे सह-संस्थापक नंदन नीलेकणी यांनी मंगळवारी आयआयटी मुंबईला 315 कोटी रुपये देणगी देत असल्याची घोषणा केली. 1973 मध्ये नीलेकणी यांनी आयआयटी मुंबईमध्ये प्रवेश घेतला होता आणि तिथूनच त्यांनी इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगची बॅचलर पदवी प्राप्त केली. आज 50 वर्षांपूर्वी आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी नीलेकणी यांनी आयआयटीमध्ये प्रवेश घेतला होता. इन्फोसिसचे सह-संस्थापक नंदन नीलेकणी हे आयआयटी मुंबईचे विद्यार्थी आहेत, गेल्या 50 वर्षांपासून ते या संस्थेशी वेगवेगळ्या माध्यमातून संपर्कात असतात. त्यांना आयआयटी मुंबई संस्थेशी जोडले जाऊन आज 50 वर्षे पूर्ण झाली. 1973 मध्ये इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे प्रशिक्षण घेण्यासाठी नीलेकणी यांनी आयआयटीमध्ये प्रवेश घेतला होता. या शैक्षणिक संस्थेसोबत असलेल्या संबंधाला 50 वर्षे पूर्ण झाली. प्रथम एक विद्यार्थी म्हणून, आणि नंतर 2011-2015 पर्यंत तिच्या प्रशासक मंडळावर राहण्यापर्यंत आजवर ते संस्थेशी जोडले गेलेले आहेत, त्याचीच एक पोचपावती म्हणून नंदन नीलेकणी यांनी मुंबई आयआयटीला 315 कोटी रुपये दान केले आहेत. आयआयटी मुंबईने जारी केलेल्या वृत्तपत्र निवेदनानुसार, याआधीदेखील नीलेकणी यांनी आयआयटीला 85 कोटी रुपयांचे योगदान दिले आहे. आता दिलेली रक्कम मिळून नीलेकणी यांनी आतापर्यंत संस्थेला एकूण 400 कोटी रुपयांची मदत केली आहे. याआधी दिलेला निधी हा नवीन वसतिगृहे बांधणे, स्कूल ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीला वीजपुरवठा करणे आणि देशाचे पहिले विद्यापीठ इनक्यूबेटर स्थापित करणे यासाठी होते, अशी माहिती आयआयटी मुंबईने दिली. आपल्या भविष्यातील योजना मांडताना, आयआयटी मुंबईने पुढील पाच वर्षांत 4 हजार 106 कोटींच्या निधीची आवश्यकता असल्याचे सांगितले. नीलेकणी यांनी दिलेली देणगी एक मदत म्हणून काम करेल आणि संस्थेला निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजना सुरू करण्यास मदत करेल, आयआयटी मुंबईने स्पष्ट केले आहे. आयआयटी-बॉम्बे माझ्या आयुष्यातील एक आधारशिला आहे, ज्याने माझ्या सुरुवातीच्या वर्षांना आकार दिला आहे आणि माझ्या प्रवासाचा पाया रचला आहे. मी या प्रतिष्ठित संस्थेशी माझ्या सहवासाची 50 वर्षे साजरी करत असताना, मी आयआयटीच्या भविष्यासाठी योगदान दिल्याबद्दल कृतज्ञ आहे, असे नंदन नीलेकणी यांनी म्हटले आहे.
ही देणगी केवळ आर्थिक योगदान नाही, तर आर्थिक योगदानापेक्षाही अधिक आहे; ज्या संस्थेने मला खूप काही दिले त्या संस्थेप्रती हे फक्त एक ऋण आहे आणि उद्याचे आपले जग घडवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेली वचनबद्धता आहे, असेही ते पुढे म्हणाले.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# भविष्यात दुष्काळाची परिस्थिती अधिक गंभीर

आधुनिक केसरी


**हवामान बदल, मातीची धूप आणि पाण्याचे सतत होणारे शोषण यामुळे आज जगाचा मोठा भाग दुष्काळाच्या भीषण समस्येला तोंड देत आहे. हिरवीगार जंगले वाळवंटामध्ये रूपांतरित होत आहेत. अलीकडेच, संयुक्त राष्ट्राने आपल्या एका अहवालात हवामान बदलामुळे दुष्काळाच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. या अहवालानुसार 2000 ते 2019 या कालावधीत एक अब्जाहून अधिक लोक दुष्काळाने त्रस्त झाले आहेत. दुष्काळापासून कोणताही प्रदेश सुटला नसला तरी आफ्रिका खंडाला त्याचा सर्वाधिक फटका बसला आहे. भविष्यात अमेरिका खंड, भारत आणि ऑस्ट्रेलियाची स्थितीही चिंताजनक ठरू शकते.**

2000 ते 2019 या काळात आफ्रिकेत 134 दुष्काळाच्या घटना घडल्या आहेत. 70 दुष्काळाच्या घटना फक्त पूर्व आफ्रिकेत पाहिल्या गेल्या आहेत. असेच तापमान वाढत राहिल्यास 2031 सालापर्यंत तापमान 3 अंश सेल्सिअसपर्यंत वाढू शकते आणि जगाला दुष्काळाचा अधिक फटका सहन करावा लागू शकतो, असा अंदाज व्यक्त केला गेला आहे.त्यात आणखी वाढ होऊ शकते. सर्वात कमी विकसित आणि विकसनशील देशांना दुष्काळाचा सर्वाधिक फटका बसला आहे. कोणत्याही भागात दीर्घकाळ पाऊस नसेल तर तिथे पाण्याची टंचाई निर्माण होते. या स्थितीला दुष्काळ म्हटले जाते. दुष्काळ हा प्रामुख्याने तीन प्रकारचा असतो. हवामानशास्त्रीय दुष्काळ, कृषी दुष्काळ आणि जलवैज्ञानिक दुष्काळ. हवामानशास्त्रीय दुष्काळ हे दीर्घ कालावधीत अपुरा किंवा फारच कमी पावसाचे वैशिष्ट्य म्हणून गणले गेले आहे. याशिवाय पावसाचे असमान वितरणही या प्रकारच्या दुष्काळाला प्रोत्साहन देते. हवामानशास्त्रीय दुष्काळाचे मोजमाप पावसाचे प्रमाण आणि शुष्कतेच्या आधारे करता येते. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्यामुळे शेतीवर दुष्काळ पडतो. कारण जमिनीत ओलावा नसल्यास पीक वाढ होत नाही. अशा प्रकारे पावसाअभावी शेतीवर दुष्काळाचे सावट दिसून येते. नद्या आणि तलाव यांसारख्या जलस्रोतांमध्ये कमी पावसामुळे पाण्याची कमतरता भासते, ज्यामुळे जलविज्ञान दुष्काळ पडतो. भारत हा कृषीप्रधान देश आहे आणि येथील बहुतांश कृषी क्षेत्र मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. जलशक्ती मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, देशातील सुमारे 68 टक्के भाग वेगवेगळ्या प्रमाणात दुष्काळाने ग्रस्त आहे. आकडेवारी दर्शवते की भारतातील 35 टक्के भागात 750 मिमी ते 1125 मिमी दरम्यान पाऊस पडतो, तर 33 टक्के भागात 750 मिमीपेक्षा कमी पाऊस पडतो, हे भाग दुष्काळाने अधिक प्रभावित आहेत. दुष्काळाचे दोन स्तर आहेत, एक मध्यम दुष्काळ, दुसरा तीव्र दुष्काळ. जेव्हा एखाद्या भागात पावसाची कमतरता 26 ते 50 टक्के असते तेव्हा तो सामान्य दुष्काळ मानला जातो, परंतु जर पावसाची कमतरता पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर तो गंभीर दुष्काळाच्या श्रेणीत ठेवला जातो. तसे पाहता, राज्य सरकारे त्यांच्या वेगवेगळ्या पॅरामीटर्सच्या आधारे दुष्काळग्रस्त भाग ठरवतात. भारतातील राजस्थान, महाराष्ट्र, कर्नाटक आणि मध्य प्रदेश हे दुष्काळाने सर्वाधिक प्रभावित झालेले प्रदेश आहेत. याशिवाय गुजरात, उत्तर प्रदेश, झारखंड आणि ओडिशाचा अंतर्गत भाग आणि तामिळनाडूचा दक्षिण भागालाही दुष्काळचा फटका बसला आहे.भारतातील दुष्काळाचे मुख्य कारण म्हणजे मान्सूनमध्ये पडणारा कमी पाऊस. 10 ते 20 दिवस उशिराने मान्सून दाखल झाला तरी दुष्काळ पडत असल्याचे निदर्शनास आले आहे.



भारतातील दुष्काळाचे एक प्रमुख कारण म्हणजे पावसाचे असमान वितरण. म्हणजे काही भागात पाऊस खूप जास्त पडतो, पण काही भागात पाऊस फारच कमी पडतो. याशिवाय, भारतात 80 टक्के पाऊस 100 दिवसांपेक्षा कमी कालावधीत पडतो, तर उर्वरित दिवसांत केवळ 20 टक्के पाऊस पडतो.याशिवाय भारताची कृषी व्यवस्थाही दुष्काळासाठी जबाबदार आहे. अनेक भागात अशी पिके घेतली जातात, ज्यासाठी पाण्याची मागणी खूप असते, परंतु तेथे पाणी कमी प्रमाणात उपलब्ध असते.त्यामुळे त्या भागात दुष्काळाचे सावट पाहायला मिळते. जागतिक बँकेचा अंदाज आहे की 2050 पर्यंत 21.6 कोटी लोक दुष्काळामुळे स्थलांतरित होऊ शकतात. म्हणजेच भविष्यात दुष्काळाची परिस्थिती अधिक गंभीर होणार आहे.

खरं तर, दुष्काळाचा पर्यावरण आणि समाजाच्या विविध पैलूंवर वाईट परिणाम होतो. पाऊस नसल्यामुळे पिके वाळून जातात. पिके वाळून गेल्याने अन्नधान्याची समस्या निर्माण होते, ज्यामुळे उपासमारीची आणि दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. या परिस्थितीचा लोकांच्या अन्नसुरक्षेवर परिणाम होतो. याशिवाय पावसाअभावी विविध भागात पाण्याची टंचाई निर्माण होते, लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध नसताना मजबुरीने मिळेल ते दूषित पाणी प्यावे लागते, त्यामुळे अनेक आजार उद्भवतात. पाण्याअभावी जनावरांच्या चाऱ्याचा व पाण्याचाही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे जनावरांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होतो. ज्यामुळे देशाच्या पशुसंवर्धन उद्योगावर विपरीत परिणाम होतो. दुष्काळामुळे जंगलाचा ऱ्हास होतो. गरिबी वाढते. आरोग्य आणि कुपोषणासारख्या समस्या वाढतात. साठेबाजीमुळे महागाई वाढते. राहणीमानात घसरण, सामाजिक अशांतता आणि स्थलांतर यासारख्या समस्या दुष्काळी परिस्थितीमुळे उद्भवतात. दुष्काळ टाळण्यासाठी काही उपाय करायला हवेत. कोणते प्रदेश आणि कोणते समुदाय दुष्काळामुळे अधिक प्रभावित आहेत हे जाणून घेण्यासाठी आपण विविध प्रदेश आणि समुदायांची असुरक्षितता प्रोफाइल तयार केली पाहिजे, जेणेकरून त्या प्रदेशांना दुष्काळापासून वाचवण्यासाठी काही धोरणे आखता येतील. सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते, त्यामुळे सिंचन व्यवस्थेतील पाण्याचे योग्य व्यवस्थापन करून दुष्काळ टाळता येतो. कोरड्या आणि पाऊस नसलेल्या भागात पाणी पुरवठ्यासाठी प्रमुख नद्या एकमेकांना जोडून ग्रीड बनवावे लागेल.पाणी साठवण्यासाठी छोटी छोटी धरणे बांधावी लागतील.पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी सिंचन पद्धती बदलल्या पाहिजेत आणि ठिबक सिंचन, तुषार सिंचन इत्यादींचा अवलंब केला पाहिजे. दुष्काळी भागात सेंद्रिय शेती जीवनदायी ठरते. या संदर्भात आयसीटी म्हणजेच माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाच्या वापरालाही चालना मिळायला हवी आणि या संदर्भात सरकारने दुष्काळाचा सामना करण्यासाठी आयसीटी तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी करावीत. यासोबतच रिअल टाईम डेटा संकलनाकडेही लक्ष द्यावे लागेल, जेणेकरुन दुष्काळाची परिस्थिती निर्माण होत असताना सुरुवातीच्या टप्प्यावरच ती थांबवण्याची कार्यवाही करता येईल. दुष्काळाच्या आपत्तीशी संबंधित जी काही धोरणे ठरवली जातात, ती खालच्या स्तराच्या पातळीवर अंमलात आणली जावीत, तरच प्रतिबंधाचे योग्य व्यवस्थापन करता येईल.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# आरोग्यासाठी योगाभ्यास व वृक्षलागवड महत्त्वाची

आधुनिक केसरी

**संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता.त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले.योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे याचे मी स्वागत करतो.योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असुन शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन, मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असुन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे.त्यामुळे ऋषी-मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती.**

आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे. अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळे पणाने बागडण्या करीता जागा किंवा ग्राउंड अपुरे पडताना दिसतात. कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.अशा परीस्थितीत लहान-मोठी,आबाल-वृध्द खुल्या हवेत बागडु शकत नाही.परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो. अशा वेळेला आपण योगा,व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात.पुर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या.अशा परीस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे.परंतु कालांतराने संपूर्ण जुने छोटे-मोठे खेळ लुप्त होतांना दिसते.परंतू शरिर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे.योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो.आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे.यात अनेक मुस्लिम राष्ट्र सुध्दा आहेत.हा भारताचा मोठा मान आहे.कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान-मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवु शकतो.आजच्या परिस्थितीत मुल पुढील भविष्याच्या वाटचालीकरीता अभ्यात मग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या आदीन झाल्याचे दिसून येते. यामुळे डोक्यावर तान येने, डोळे दुखने,मेंदुवर परीनाम होने इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कांपुटरमुळे होतांना आपण पहातो. परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करने, व्यायाम करणे, जिमनॅस्टिक,किंवा जिमच्या माध्यमातून शरिरयष्टी सुदृढ ठेवने अत्यंत गरजेचे आहे.आपण योगाभ्यासचा विचार केला तर भारतात अनेक युगानु-युगापासुन योगाभ्यास ऋषी-मुनी,साधु-संत, महायोगी, तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची. परंतु आज वाढते प्रदुषण, धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग,वाढते औद्योगिकीकरण व शहरीकरण यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात.परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो.त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासला जास्त महत्व दिले आहे.भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे.त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची मोठी दीशा देण्याचे काम सुद्धा केले आहे.भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहाला आहे.त्याच ठीकाणी चीन हा जागतिक पातळीवर करोना महामारीच्या रूपाने व विस्तारवादी नितीमुळे करोडो लोकांचा हत्यारा बनला आहे.भारताच्या चांगल्या कामाने जगाचा गुरू बनला तर चीन जगाचा दुश्मन बनला आहे.योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे.योग दीनाच्या निमित्ताने प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी "घर तीथे झाड" ही मोहीम राबवुन या दीवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देवुन वृक्षारोपण केले पाहिजे.कारणआरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे.आपल्या राज्यात ३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार २८८ (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार, कलेक्टर,बीडीओ, असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी. जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे. आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगाकरणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने शाळा, महाविद्यालये, एसटी स्टँड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल.अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे.कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे. योगाभ्यासमुळे शारीरिक, मानसिक,आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो.त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्विकारले आहे.भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन-नवीन आजार चिंतेचा विषय आहे.त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# बंजारा समाजाच्या विकासासाठी वचनबद्ध

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बंजारा समाजाच्या विकासासाठी आम्ही वचनबद्ध असून या समाजाच्या विकासासाठी सरकार सर्वतोपरी मदत करून समाजाच्या मागे पूर्ण ताकदीने उभे राहील अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. गोर बंजारा तीर्थक्षेत्र बारा धामचे निर्माते ॲड. पंडित राठोड यांच्या भाजपा प्रवेश कार्यक्रमात श्री. फडणवीस बोलत होते. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, भाजपा प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील, नवनाथ पडळकर आदी यावेळी उपस्थित होते. बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.पी.टी.चव्हाण, गोद्री कुंभमेळा संयोजक व धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधात कार्य करणारे डॉ.मोहन चव्हाण, मेनकाताई राठोड, सुमित राठोड यांच्यासह या समाजाचे अनेक नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी यावेळी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या सर्वांचे स्वागत केले. या प्रसंगी उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टीच बंजारा समाजाला न्याय देऊ शकते असा विश्वास या समाजाला आहे. म्हणूनच राष्ट्रीय स्तरावर बंजारा समाजाच्या प्रगतीसाठी कार्यरत असणारे कार्यकर्ते मुख्य राजकीय प्रवाहात सामील झाले आहेत. या समाजातील युवकांना रोजगार देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. वसंतराव नाईक विकास महामंडळाला निधीची कमतरता भासू देणार नाही, असेही ते म्हणाले. मोदी सरकारच्या लोकोपयोगी योजनांचा अनेकांना लाभ होत असून विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते भाजपामध्ये येण्यास इच्छुक आहेत असे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगीतले. ॲड. राठोड भाजपामध्ये दाखल झाल्यामुळे पक्ष आणखी मजबूत होईल आणि भाजपाच्या साथीने बंजारा समाज नवी उंची गाठेल असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# आम्ही दडपशाहीच्या विरोधात लढत राहणार : खा. सुळे

## जे 'गद्दार' असतील त्यांना 'गद्दार' म्हणायची ताकद माझ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** या राज्यात लोकशाही राहिली आहे का ? असा सवाल करतानाच रस्त्यावर आंदोलन करायला परवानगी मिळत नसेल तर कितीही किंमत मोजावी लागली तरी आम्ही दडपशाहीच्या विरोधात लढत राहणार असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रियाताई सुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिला. दरम्यान 'महाराष्ट्र कभी झुका है, ना कभी झुकेगा'... 'मोडेन पण वाकणार नाही' जे 'गद्दार' असतील त्यांना 'गद्दार' म्हणायची ताकद माझ्यात आहे असे खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सरकारला ठणकावून सांगितले.
आम्ही गद्दार दिवस साजरा करत आहोत आणि या कारणासाठी आम्हाला जेलमध्ये टाकणार असाल तर आम्ही जेलमध्ये जायला तयार आहोत असेही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी स्पष्ट केले.
शिंदे गटाचे मंत्री शंभूराज देसाई हे बोलायला इतके पक्के आहेत की, त्यांनी कॅमेऱ्यासमोर 'पन्नास खोके' तुम्हाला हवेत का... अशी ऑफर दिली होती. त्यामुळे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना सांगितले पाहिजे की, तुमच्या सरकारमधील मंत्रीमंडळातील मंत्री भ्रष्टाचाराची ऑफर देतात मोदीजी तुम्ही बोलला होतात 'न खाऊंगा ना, खाने दुंगा' याची आठवणही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी करुन दिली.
आज टिव्ही आणि वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या वाचल्या व पाहिल्यानंतर लक्षात आले की, आज २० जून म्हणजे गद्दार दिवस आहे. आज महाराष्ट्राच्या सरकारमध्ये ज्या घटना घडल्या. त्या घटनेला टिव्हीवर 'गद्दार दिवस' म्हणत आहेत हे पाहिले असे स्पष्ट करतानाच माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी 'गद्दारी' केली असे काहीजण म्हणत आहेत तर त्याच उध्दव ठाकरे यांच्या कॅबिनेटमध्ये ते मंत्री होते हे विसरले का ? असा टोलाही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना लगावला.




# भव्य अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खंडागळे**

**दिंडोरी :** स्पर्धा परीक्षांना सामोरे जात अधिकारी होण्याचे स्वप्न ऊराशी बाळगून अभ्यास करणाऱ्या भावी अधिकाऱ्यांच्या पंखात बळ देण्यासाठी विधानसभेचे उपाध्यक्ष नामदार नरहरी झिरवाळ यांचे प्रयत्नातून साकारलेल्या भव्य अभ्यासिकेचा लोकार्पण सोहळा करंजाळी येथे संपन्न झाला.

प्रारंभी सजवलेल्या बैलगाडीत क्रांतीवीर भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळा मिरवणूकीसह ग्रंथदिंडी काढण्यात आली. पेठ तालुक्यातील इयत्ता 10 वी, 12 वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. वारी आपल्या दारी उपक्रमातंर्गत पाइकांचे अभंग व शुध्द ऐसे ब्रम्हज्ञान या दोन ग्रंथाच्या वितरणाचा शुभारंभ करण्यात आला. गाव तेथे वाचनालय ही संकल्पना साकारण्याची गरज असल्याचे मिटकरी यांनी सांगितले. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी जन्मदिवसाच्या दिवशी अभ्यासिका सुरू करण्याचे भाग्य मिळाल्याबद्दल पेठ तालुक्यातील विविध संस्थांचे त्यांनी आभार मानले.




याप्रसंगी आमदार अमोल मिटकरी, नागपूरचे अविनाश महाराज काकडे, जयंत वानोळे, प्रकाश वडजे, विलास कड, महंत रमणगिरी महाराज,शिवसेना तालुकाप्रमूख भास्कर गावीत, नगराध्यक्ष करण करवंदे, उपनगराध्यक्ष अफ्रोजा शेख, विठोबा भोये, नामदेव हलकंदर, साध्वी ताराबाई बागूल , गोकूळ झिरवाळ, नगरसेवक जितेंद्र जाधव, शितल रहाणे,राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष गिरीश गावीत, हिरामण पवार, कॉंग्रेजचे तालुकाध्यक्ष गणपत चौधरी, याकूब शेख, रामदास गवळी, पूनम गवळी, संतोष डोमे, पुंडलिक महाले, सुरेश खंबाईत, सरपंच दुर्गानाथ गवळी, उपसरपंच भास्कर जाधव, कृषी भूषण यशवंत गावंडे, तहसीलदार अनिल पूरे, तालुका कृषी अधिकारी अविनाश खैरनार,सहाय्यक गटविकास अधिकारी सुहास शिंदे, गटशिक्षणाधिकारी प्रशांत जाधव, उप अभियंता अनिल भडांगे, तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ. योगेश मोरे,एकता फाऊंडेशन, एकता वाचनालय, यशोदिप सामाजिक संस्था, ग्राम पंचायत करंजाळी यांचे सह तालुक्यातील पदाधिकारी, अधिकारी, नागरिक उपस्थित होते. प्रा.दिलेंद्र भूसारे यांनी प्रास्तविक व सुत्रसंचलन केले.




महाराष्ट्र Business Katta













# मराठा सेवा संघाचे मुलींचे वसतिगृह : मोठी उपलब्धी

आधुनिक केसरी

**समाजातील मुला मुलींना बाहेरगावी शिक्षण घेणे सोयीचे व्हावे आणि त्यांची गैरसोय टळावी, यासाठी सर्वच धर्मात- समाजात ठिकठिकाणी वसतिगृह आहेत. अशा बाबतीत जैन समाजबांधव, माहेश्वरी समाज बांधवांचे धोरण अभिमानास्पद असते. मराठा समाज हा बहुसंख्य समाज, शिवाय आतबट्ट्याचा व्यवसाय असणारी शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असल्याने आर्थिकदृष्ट्या सक्षम नसणाऱ्यांची संख्या अधिक. अशा वेळी आपल्या पाल्यांवर अधिकचा खर्च करणे त्यांना झेपावणारे नसते. मुलं हुशार जरी असली तरीही त्यांना शिक्षणाला किंवा मोठ्या शहरातील शिक्षणाला मुकावे लागते.आपल्या मुलांना मुलभुत शिक्षण देण्यासाठी आर्थिक व अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांनी कधीच एकत्रित न आलेल्या मराठा बांधवांना मराठा सेवा संघाच्या माध्यमातून एकत्रित आणले आणि समाजजागृती, समाजाचे संघटन आणि मराठ्यांचा- छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व बहुजन राष्ट्रपुरुषांचा इतिहास जगासमोर आणण्याचे काम ॲड पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी केले. मराठा सेवा संघाच्या माध्यमातूनच त्यांनी इतरांना प्रेरणा देत, मार्गदर्शन करत विविध ठिकाणी वसतिगृह, अभ्यासिका, सिंदखेडराजा येथे जिजाऊ सृष्टी उभी केली. आज नांदेड येथे मराठा सेवा संघाच्या मुलींच्या वसतीगृहास भेट देण्याचा योग ॲड पुरुषोत्तम खेडेकर साहेबामुळेच आला.

माझा लहाना मुलगा उत्कर्ष हा यंदा दहावी उत्तीर्ण झाला आणि नांदेड येथे नीट च्या क्लास ला जाण्याची त्याने इच्छा व्यक्त केली. त्याच्या निर्णयासोबत जाण्याचे आम्ही ठरवत नांदेड येथील एका क्लास ला त्याचा प्रवेश घेतला आणि नांदेड येथेच येऊन घर भाड्याने घेऊन माझी पत्नी, मुलगा, माझा मित्र गजानन म्हस्के चा मुलगा आदित्य असे नांदेड येथे वास्तव्य करत आहेत. त्यामुळे मी देखील, आठवडाभर नांदेड येथेच तळ ठोकून असतांना सहजच एका सोयरसबंधाच्या चौकशीच्या अनुषंगाने खेडेकर साहेबांचा कॉल आला व तुझं काय सुरू आहे, कुठे आहेस असा प्रश्न साहेबांनी केल्याने साहेबांना मी नांदेड ला असल्याचे व इतर माहिती सांगितली.

साहेबांनी लागलीच नांदेड येथील 4,5 स्वकीयांचे मोबाईल नंबर मला पाठवले व यांच्याशी संपर्क साध असा आदेशच दिला. स्मृतीशेष चंद्रभान पाटील जवळेकर मामा, मधुकर मामा देशमुख, कामाजीराव पवार, क्षिरसागर मामा, शिवाजीराव खुडे, सुदेशराव देशमुख यांसारख्या असंख्य समाजधूरिणांच्या पुढाकारातून व समाजातील शेवटच्या घटकाच्या खारीच्या वाट्यातूनच वसतिगृहाची भव्यदिव्य इमारत, तळ घर, ग्राउंड फ्लोअर, पहिला मजला आणि दुसरा मजला ,तिसरा मजला अशी पाच मजली इमारत भक्कम ऊभी ठाकली आहे. मी तिथे जाताच सुरक्षा रक्षकाने जय जिजाऊ म्हणत माझे स्वागत केले. यावेळी वसतीगृहाचा सर्वांच्या सहकार्याने चालणारा पारदर्शी कारभार, मुलींची नाममात्र असणारी प्रवेश फी, त्याबाबतचा दररोजचा त्यांच्या व्हाट्सअप ग्रुपला जाणारा हिशोब, त्यांच्या हिशोब वहीत केलेली नोंद, याव्यतिरिक्त वसतिगृहातील कमालीची स्वच्छता, वसतिगृहात जग्वार सारख्या कंपनी चे दर्जेदार साहित्य, उत्तम स्टील चा वापर करून लावण्यात आलेल्या रेलिंग, दर्जेदार खिडकी अशा पद्धतीने समाजाचा पैसा वाचवत परंतु कामाशी कुठलीही तडजोड न करता बारीक बारीक गोष्टीकडे दिल्या गेलेले लक्ष दिसून येत असतांना मुलींची सर्वच बाबतीतील घेतल्या जात असलेली काळजी, स्वयंपाक गृहातील स्वच्छता, उत्तम दर्जाचे धान्य व इतर सामानाचा वापर त्यात मुलींना 2 वेळा जेवण आणि सकाळी नास्ता हे सगळं अवघ्या 30 हजार रुपयात उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय तुम्ही कुठल्याही क्लास ला प्रवेश घ्या किंवा कुठेही शिका, तरीही या वसतिगृहात विविध विषयाचे तज्ञ येऊन सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून विनामूल्य शिकवतात. यात समाजातील उच्च शिक्षित निस्सीम भावनेतून ही सेवा देतात. अलीकडच्या काळात समाज माध्यमे तुमच्या आमच्यावर जास्त हावी झालेली आहेत असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही.त्यामुळे रात्री साडे आठ वाजता सर्व मुलींचे भ्रमणध्वनी जमा करून घेतल्या जातात, जेने करून समाजमाध्यमा वर विद्यार्थिनींचा मोलाचा वेळ जाऊ नये हा शुद्ध हेतू त्या पाठीशी आहे. सकल मराठा मोर्चा ने तमाम मराठ्यांना एकत्रित आणले, नांदेड जिल्ह्यात लोकवर्गणी जमा झाली विशेषतः सर्वधर्मीयांनी यात आपला सहभाग नोंदवला आणि त्यातून हे वसतिगृह उभे राहले ही सामाजिक स्तरावरील फार मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. उपरोक्त वसतीगृहाला भेट दिली असतांना मराठा सेवा संघाचे नांदेड जिल्हा सचिव ॲड. सतीश कुमार जाधव ह्या सेवाभावी वृत्तीच्या भल्या माणसाची देखील भेट झाली. आपले नाव समोर न येऊ देता अशी अनेक मंडळी यासाठी



सामाजिक भावनेतून झटत आहे. अशा पद्धतीचे वसतिगृह- अभ्यासिका ठिकठिकाणी होणे गरजेचे असून ती काळाची नितांत गरज आहे.आणि मराठा सेवा संघाचे याबाबतीतील कार्य अभिनंदनीय आहे. हीच प्रेरणा घेऊन ठिकठिकाणी असे वसतिगृह उभे राहत आहेत आणि अनेक ठिकाणी सुरू आहेत. मंदिरे बांधायची असली की आम्ही तात्काळ वर्गणी जमा करतो. त्यासोबतच अशा विधायक कामासाठी समाजाने आणि समाजातील दात्या मंडळीने आपले चंदनाचे हात समोर करणे खूप महत्वाचे आहे.

# महिलांनी चळवळीमध्ये नेतृत्व करावे




विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आंबेडकरवादी चळवळीची अवस्था पाहता जो तो आपली दुकानदारी चालवण्याण्या नादात मुळ चळवळच विसरून गेला. संघटीत होण्या ऐवजी विना विचारधारेचा व विना कार्यकर्त्यांचा राष्ट्रीय नेता म्हणजे केवळ आंबेडकरवादी चळवळीची थट्टा लावली आहे. स्वतःला आंबेडकरवादी समजायचे आणि आंबेडकरांच्या विचाराचे कोणतेही काम करायचे नाही, किंवा जो कोणी खऱ्या अर्थाने चळवळीचे काम करतो त्याला पुढे येऊ द्यायचे नाही, त्याचे मानसिक खच्चीकरण करायचे, त्याच्या कार्यावर व विचारावर बोलायचे नाही ही वृत्ती जास्त प्रमाणात वाढली म्हणून खऱ्या अर्थाने प्रामाणिक चळवळीचे काम करणाऱ्या आणि समाज हितासाठीच समजाचे एकत्रीकरण आणि संविधानाची जनजागृती करणाऱ्या लोकांना कोणी समोर येऊच देत नाही हि वास्तविकता आहे.**

एकमेकांचे पाय ओढणे, स्वतः च्याच दुकानाची जाहिरात करणे, एकटाच चळवळ चालवतो अशा स्वप्नात राहणे हेच खऱ्या चळवळीला मारक आहे. चळवळीच्या नावाखाली पद, प्रतिष्ठा आणि पैसा यापैकी काहींना काही मिळवण्यासाठीच अनेकांनी आपली दुकानदारी सुरू केली. आपली दुकानदारी व प्रतिष्ठा कायम राहावी म्हणून हे सतत तळमळ करत असतात. बाबासाहेब आंबेडकर यांचा संघटीत होण्याचा संदेश पायदळी तुडवून स्वतः लाच श्रेष्ठ समजण्यात कोणता मोठेपणा आणि चळवळ आहे त्यांनाच माहिती. हजारो राष्ट्रीय नेते असून एकही नेता गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करत नाहीत, कोणाला वैद्यकीय मदत करत नाहीत, अत्याचार झाल्यावर फक्त सात्वंन करण्याचे नाटक केले जाते न्याय मिळत नाही तेव्हा कोणी च समोर येत नाही. बेरोजगार तरुण तरीही कोणी रोजगाराची सोय करत नाही. अशी परिस्थिती असताना यांना नेते म्हणायचे कसे हा प्रश्न आहे. संघटीत होऊन हजारो शाळा महाविद्यालय, बँक, हॉस्पिटल निर्माण व्हायला पाहिजे होते परंतु त्या पैकी काहीच निर्माण झाले नाही आणि बेकीमुळे केवळ हजारो बिनकामी नेते निर्माण झाले. हे नेते स्वतः लाच सर्व श्रेष्ठ समजत असतील तरीही बहुतांश नेते स्वतः जरी उभे राहले तरी ग्रामपंचायत ची निवडणूक जिंकु शकत नाहीत. आपल्या च परिसरातील अन्याय अत्याचार थांबवू शकत नाहीत. तरीही हे तोऱ्यात मिरवतात. चळवळीमध्ये अजून एक वर्ग आहे तो म्हणजे स्वतः ला विद्वान समजणारा. हा वर्ग स्वतःला विद्वान समजून चळवळीचा मार्गदर्शक समजतो. परंतु असे बहुतांश विद्वान एवढे पोरकट आणि बालीश वागतात कि डोक्यात मेंदू आहे की नाही याचा प्रश्न पडतो. विद्वान समजणारे लोक पद, नाव अशा गोष्टी साठी वाद घालत बसतात तेव्हा त्यांची लायकी समजून येते. एकंदरीतच परिस्थिती खुप बिकट होत चालली आहे. समस्या वाढत चालल्या आहेत. शिक्षण, नोकरी, आरोग्य सुविधा बंद होऊनही हक्क अधिकार मर्यादित होत आहेत. स्वयंघोषीत पावरफुल नेते यापैकी काहीच थांबवू शकत नाहीत. म्हणून आंबेडकरवादी चळवळीमध्ये नवीन उर्जा भरून सामाजिक समस्या सोडवायच्या असतील आणि संविधानाचे रक्षण करायचे असेल तर महिलांनी नेतृत्व करून सध्याच्या सर्व संकल्पना हानुन पाडायला पाहिजे. महिलांनी नेतृत्व करून शिक्षण, रोजगार आरोग्य यावरती काम करून राजकीय नेतृत्व देखील करणे गरजेचे आहे. परंतु नेतृत्व करताना पुरुषांनी ज्या चुका केल्या त्या चुका टाळल्या तरच आपण चळवळीमध्ये आशावाद निर्माण करू शकु. एकछत्री जनता करण्यासाठी नेतृत्व हवे जनतेला कोणताही दिशेने घेऊन जाणारे नेतृत्व मुळीच नको. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेले आपल्याला टिकवता आले नाही आणि वर तोंड करून मीच बरोबर आहे हे बोलण्याची हिंमत होते तरी कशी ? आपण ज्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे व कार्याचे शत्रु समजतो त्या लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने जाऊन, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने संस्था काढून हॉस्पिटल, शाळा महाविद्यालयात, बँक, व इतर उद्योग तयार करून त्यांच्या समाजाला बळकट केले. आम्ही फक्त त्यांना शिव्या देऊन स्वतःला मोठे समजण्याचा मुर्खपणा करतो. महिलांनी नेतृत्व केले तर अन्याय अत्याचारा विरोधात महिला आवाज उठवून न्याय मिळेपर्यंत बाजु उचलून धरतील. सामाजिक एकीच्या माध्यमातून दबाव गट तयार करतील. बचतीच्या माध्यमातून जिल्हा तालुका पातळीवर हॉस्पिटल, बँक शिक्षणसंस्था आवश्यक आहे त्याची निर्मिती करतील. आंबेडकरवादी चळवळ म्हणजे केवळ अत्याचार ग्रस्त कुटुंबाला भेट देऊन सात्वंन करणे नाही तर पुन्हा अत्याचार होऊ नाही म्हणून व्यवस्था करणे. समाजाला लुटून स्वतः चे पोट भरणे नव्हे तर स्वतः च्या पदरचे खर्चून समाजाचे हित करणे, स्वतः च्या फायद्यासाठी मत मागणे नव्हे तर मताची किंमत मजबूत करणे म्हणजे आंबेडकरवाद होय. महिलांनी आंबेडकरवाद समाजात रुजवण्यासाठी व रमाई बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या परिश्रमाचे चित होऊन त्याच्या फायदा येणाऱ्या पिढीला मिळण्यासाठी नेतृत्वाची धुरा हाती घेऊन बेकी करणारे, स्वतः चे दुकानदारी चालवणाऱ्या व समाजाची दिशाभूल करून पैसा गोळा करणाऱ्यांना वठणीवर आणायला पाहिजे. चळवळ म्हणजे केवळ पोटभरण्याचे साधन नाही तर स्वाभिमान, हक्क अधिकार टिकवून सर्वांगीण प्रगती करण्याचे माध्यम आहे. याची जाणीव असणे आवश्यक आहे. महिलांनी नेतृत्व केले तर महिला दूकानदारी सुरू करणार नाहीत, समाजाची लुट करणार नाहीत, स्वतः च्या फायद्यासाठी विरोधी लोकांशी तडजोड करणार नाहीत. जबाबदारी चे भान ठेवून सामाजिक सन्मान व स्वाभिमान महिला निर्माण करू शकतात. परंतु यातही काही ठिकाणी पुरुषांचा अहंकार जागृत होऊन महिलांचे नेतृत्व नाकारण्यात येईल किंवा महिलांना दाबण्याचा प्रयत्न करण्यात येईल. ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. चळवळ म्हणजे पद प्रतिष्ठा पैसा एकाच व्यक्ती कडे किंवा एकाच व्यक्तीच्या नावाने काम करणे मुळीच नसते. सामाजिक काम मग जे वैचारिक पद्धतीने स्वार्थ न बघता कोणीही करत असेल तर त्याला समर्थन करून प्रोत्साहन देणे हे खऱ्या अर्थाने चळवळ होय. कारण आपण करणार ते काम दुसरे कोणी कळत आहे याचा अर्थ स्वतः ची मेहनत कमी होऊन काम जास्तीत होत आहे याचे समाधान वाटणे म्हणजे चळवळ आहे. श्रेयासाठी मोठेपणासाठी कोणत्याही कामामध्ये अमुक व्यक्तीचे नाव आलेच पाहिजे, नाव नाही आले तर काम होऊ देणार नाही याला चळवळ नाही तर अरेरावी म्हणतात. अरेरावी करून चळवळ होत नाही. महीलांनी एकत्र येऊन बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित चळवळीचे काम करण्यासाठी नियोजन करून सामाजिक धुरा सांभाळून सामाजिक क्रांती करणे आजच्या घडीला आवश्यक आहे. गट तट व स्वयंघोषित नेतेगीरी, दूकानदारी हानुन पाडण्याची क्षमता महिलांमध्येच आहे. म्हणून चळवळीचे काम करण्यासाठी, परिस्थिती चे गांभीर्या लक्षात घेऊन घरकामातुन वेळ काढून नेतृत्व विकसित करून विचाराचा प्रसार प्रचार करून पुन्हा एकछत्री, स्वाभिमानी व ताकदवर व्यवस्था महीलांनी उभी करणे अपेक्षित आहे. महिला नेतृत्व करण्यासाठी समोर यायला लागल्या तर आपल्याला अनेक बदल दिसतील. महिलांनी फक्त एवढी जरी जाणीव ठेवली की आपल्याला हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी रमाईने चार लेकरं आणि बाबासाहेब आंबेडकर यांनी चार लेकरं प्रत्येक क्षणी बाबासाहेब यांच्या सोबत खंबीर पणे उभी असलेली पत्नी रमाई गमावली. बाबासाहेब आंबेडकर यांनी खुप काही गमावून आपल्याला अपेक्षेपेक्षा खुप काही दिले. त्यांनी खुप काही दिल्यामुळे अनेकांनी खुप काही कमावले. परंतु बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील व्यवस्था व देश निर्माण करू शकलो नाही याची खंत आजही आहे. विचार करा बाबासाहेब आंबेडकरांनी जे आम्हाला कमवुन मिळवून दिले त्या मध्ये आम्ही वाढ तर करु शकलो नाही पण ते टिकवू पण शकलो नाही याचे दुःख होत नसेल तर त्याला माणूस म्हणावे का ? बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः चे गमावून जे आपल्याला मिळवून दिले किमान ते टिकवण्यासाठी तरी महिलांनी नेतृत्व करून सामाजिक परिवर्तनासाठी हात भार लावावा. पुरुष तर स्वतः च्या अंहकारात आणि बेगडी वर्चस्वात सर्व काही गमावत आहेत.

# मोदींचा अमेरिका दौरा गेम चेंजर ठरणार



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी २१ ते २४ जून दरम्यान अमेरिका दौऱ्यावर जाणार आहेत. व्हाईट हाऊसमध्ये पोहोचल्यानंतर मोदींना २१ तोफांची सलामी देण्याची ही पहिलीच वेळ असेल. त्यांच्या सन्मानार्थ २२ जून रोजी व्हाईट हाऊसमध्येच राज्यस्तरीय डिनर होणार आहे. पण त्याच्या एक दिवस आधी म्हणजे २१ जून रोजी राष्ट्राध्यक्ष जो बिडेन आणि फर्स्ट लेडी जिल बिडेन मोदींसाठी खास डिनरचे आयोजन करत आहेत. हा दौरा कसा ऐतिहासिक ठरणार आहे. पंतप्रधान मोदी आपल्या ९ वर्षांच्या कार्यकाळात ८ व्यांदा अमेरिकेला भेट देत आहेत. २०१४ मध्ये त्यांनी पहिल्यांदा अमेरिकेला भेट दिली आणि त्याच वर्षी डिसेंबरमध्ये त्यांनी संयुक्त राष्ट्रात भाषण दिले. देश-विदेशातील तज्ज्ञांनी या भेटीकडे डोळे लावून बसले आहेत.**

नरेंद्र मोदींची ही भेट ऐतिहासिक आणि गेम चेंजर ठरणार आहे.ही भेट खूप ऐतिहासिक ठरणार आहे पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळाचे दहावे वर्ष सुरू झाले असून, अनेक गोष्टींची अंमलबजावणी करण्यात आली आहे. ही भेट देखील विशेष आहे कारण ते एकमेव भारतीय पंतप्रधान असतील जे त्यांच्या कार्यकाळात दुसऱ्यांदा अमेरिकन संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करतील. भारत-अमेरिकन संबंधांमध्ये सध्या जी ऊर्जा दिसून येत आहे, त्याचे एक कारण म्हणजे पंतप्रधान मोदी हे संबंध अधिक घट्ट करण्यात मग्न आहेत. बदलाचे सर्वात मोठे सूचक म्हणजे गेल्या दीड वर्षांपासून युक्रेन युद्ध सुरू असतानाही भारताने संबंध संतुलित ठेवले आहेत. रशिया हा भारताचा जुना मित्र आणि मित्र असल्याने इतर पाश्चात्य देशांशी विशेषतः अमेरिकेचे संबंध अतिशय वेगाने नवीन उंची गाठत आहेत, त्यामुळे समतोल साधणे कठीण जाईल, अशी भीती होती, परंतु गेल्या दीड वर्षात आपले संबंध खूप चांगले झाले आहेत. यूएस-भारत संबंधात सध्या दोनच मापदंड आहेत. पहिले म्हणजे, आपल्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण किती आहे, दुसरे म्हणजे संरक्षणाच्या बाबतीत किती उष्णता येऊ शकते. भारतालाही आपले संरक्षण उत्पादन वाढवायचे आहे आणि त्यामुळे ही बाब विशेष अवघड बनली आहे. ISAT ( इनिशिएटिव्ह ऑन कौन्सिल ऑफ इमर्जिंग टेक्नॉलॉजीज ) वर जानेवारीमध्ये स्वाक्षरी करण्यात आली. यामध्ये भारत-अमेरिका एकत्र कसे काम करतील याची रूपरेषा ठरविण्यात आली. गेल्या आठवड्यात अमेरिकेचे संरक्षण मंत्री ऑस्टिन लॉअर भारतात आले होते तेव्हा संरक्षण करारावरही चर्चा झाली होती. आशा आहे की पीएम मोदींच्या दौऱ्यात या दोन्ही गोष्टींवर चर्चा होईल आणि ठोस करारही होईल.

भारत आणि अमेरिकेला एकमेकांची गरज आहे

आज ज्या प्रकारे भू-राजकीय संदर्भ आणि नकाशा बदलत आहे, भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध परस्पर सहकार्य आणि समन्वयावर आधारित आहेत. परराष्ट्र व्यवहार तज्ञ हर्ष व्ही पंत म्हणतात, "आम्ही आमच्या जुन्या समस्यांमधून पुढे जात आहोत. गुरुत्वाकर्षणाचे केंद्र इंडो-पॅसिफिक प्रदेश बनले आहे. भारताची सर्वात मोठी समस्या ही चीन आणि त्याची विस्तारवादी वृत्ती आहे. युक्रेन युद्ध सुरू असतानाही दोन्ही देश एकमेकांसोबत समेट घडवून आणण्याचे काम करत आहेत. युक्रेनचा मुद्दा असो की इतर अनेक मुद्दे ते येतील आणि जातील हे दोन्ही देशांना माहीत आहे, पण चीन हे दोघांसाठी आव्हान आहे. त्यामुळेच द्विपक्षीय संबंध असोत किंवा क्वाडचे सदस्यत्व आणि विस्तार, तांत्रिक-संरक्षणविषयक बाबी असोत किंवा लष्करी सहकार्य असो, दोन्ही देश सातत्याने पुढे



जात आहेत. भारत आणि अमेरिका आता बहुपक्षीय संबंधांमध्ये आणि जागतिक पातळीवर गुंतले आहेत याचे कारण म्हणजे धोरणात्मक संदर्भ बदलले आहेत,

भविष्यात संबंध अधिक दृढ होतील

चीनची आक्रमक वृत्ती दोन्ही देशांसाठी चिंताजनक आहे. पॅसिफिक क्षेत्रात स्थिर संतुलन राखणे हे दोन्ही देशांच्या हिताचे आहे. आमच्या अनेक काळज्या, ज्या होत्या त्याही नाहीशा झाल्या आहेत. बिडेन प्रशासन आले तेव्हा भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप होईल, मानवाधिकार आणि इतर समस्यांबाबत भारताला अडचणीत आणेल, अशी भीती होती, पण ती चिंता संपली आहे. नुकतेच व्हाईट हाऊसमध्ये पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने भारतीय लोकशाहीवर प्रश्न विचारला असता, तेथे जाऊन पाहण्याचा सल्ला दिला होता. भारतीय लोकशाही खूप चांगले काम करत असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. दोन्ही देशांसमोर मोठे आणि सामरिक मुद्दे आहेत, त्यामुळे दोघेही त्यावर काम करत आहेत.

जागतिक स्तरावर चीनचे नियंत्रण आणखी वाढेल आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत आणि अमेरिकेसारख्या समविचारी देशांना एकत्र यावे लागेल. हे लक्षात घेऊन दोन्ही देश एकत्र येत आहेत आणि पुढेही जात राहतील. भारत-अमेरिकन संबंधांमधील विशेष गोष्ट म्हणजे दोन्ही देशांतील सरकार किंवा पक्ष कोणताही असो, ते द्विपक्षीय संबंधांच्या बाबतीत पुढे गेले आहेत. जॉर्ज बुश असो वा ओबामा किंवा ट्रम्प किंवा बिडेन, त्यांनी संबंधांना प्राधान्य दिले आहे. मोदी पंतप्रधान झाल्यानंतरही अमेरिकेने त्यांना व्हिसा देण्यास नकार दिल्याने त्यांच्यातील कटुता दिसून येईल, अशी भीती होती, पण पंतप्रधान मोदी ती गोष्ट अत्यंत शालीन पद्धतीने विसरले. २०१४ पासून आजपर्यंत तो इथपर्यंत पोहोचला आहे, दोन्ही देश संबंध अधिक दृढ करण्यासाठी उत्सुक आहेत, दोन्ही देशांचे प्रमुख उत्सुक आहेत आणि भारत-अमेरिका संबंध नव्या उंचीवर पोहोचतील अशी अपेक्षा करायला हवी.

# फोटोची वाट पहात बसलेली कविता...



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मागील आठवड्यात जेष्ठ कादंबरीकार, कथाकार महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक आदरणीय गुरुवर्य श्री बाबाराव मुसळे सरांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस विदर्भ साहित्य मंडळाने वाशीम येथे मोठ्या थाटामाटात साजरा केला. या सुंदर कार्यक्रमाला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी गुरुवर्य प्रा.इंद्रजित भालेराव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे सर्वच फोटो आदरणीय भालेराव गुरुजींनी मला पाठवून दिले आणि सर्व भाषणांचे व्हिडिओ आदरणीय मुसळे सरांनी त्यांच्या युटूब लिंकसह मला पाठवून दिले.**

फोटो आणि सर्व भाषणांच्या व्हिडिओत सृजनांचा गोड स्नेहमेळा जमलेला पाहून मन हर्षोल्हासाने बागडायला लागले. एकीकडे स्वतःच्या कोषात बंदिस्त असणारी माणसे आपल्यावर उपचार करण्यासाठी दवाखान्याच्या पायऱ्या झिजवत असतांना इथे सृजनशील मनाची माणसं एकमेकांचा उत्साह द्विगुणीत करण्यासाठी शेकडो किलोमीटरचे अंतर कापून एकमेकांच्या लेखणीचे तोंडभरून कौतुक करतांना पंचाहत्तरीतील बाबाराव मुसळे आणि पसष्टीतील इंद्रजित भालेराव कसे खळाळ, स्वच्छ नदीसारखे वाहताहेत! हे अलौकिक दृश्य पाहून लेखक काय असतो आणि कसा असावा ? याचे उत्तमोत्तम उदाहरण म्हणजे हे दोन्ही गुरुवर्य होत!

या लेखन प्रपंचाचे कारण म्हणजे मागील वर्षी ऑगस्ट २०२२ महिन्यात गुरुवर्य इंद्रजित भालेराव सरांचा 'भूमिनिष्ठांची मांदियाळी' कविता संग्रह प्रकाशित झाला. पूज्यनीय, निस्पृह वृत्तीने महान कार्य करणाऱ्या मंडळींना सरांनी काव्यबद्ध केलेला हा काव्य संग्रह मागील कविता संग्रहांसारखाच लोकप्रिय ठरला. त्यावर अनेकांनी आपले समीक्षण लिहिले. त्यातच जेष्ठ कादंबरीकार, कथाकार श्री बाबाराव मुसळे सरांनी सुद्धा या ग्रंथावर समीक्षण लिहून मिडीयावर प्रसिद्ध केले. हे समीक्षण भालेराव सरांनी वाचल्याबरोबर आपल्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया देतांना मुसळे सरांचे ओतप्रोत कौतुक केले. मुसळे सरांचे वय आणि त्यांचे सुरु असलेले लेखन कार्य निश्चितच आपल्या सर्वांना पथदर्शी आहे याचा उल्लेख केला. तसं पाहिलं तर हे दोन्ही लेखक माझे आवडते लेखक आणि व्यक्ती सुद्धा! एकाची कथा-कादंबरी तर दुसर्याची भाव कविता नेहमीच मनाचा ठाव घेत असते. अशा दोन महान लेखकांनी एकमेकांविषयी एवढं प्रांजळ, सुंदर, उत्कृष्ट लिहिलेलं वाचलं की; आत्मप्रौढीत अडकलेल्या छोट्या-छोट्या कवी-लेखकांची कीव यायला लागते. या दोन्ही महानुभाव गुरुवर्यांचे लेखन वाचून हे दोन्ही सृजन एकमेकांच्या भेटीला आले असून त्यांच्यामध्ये कसा साहित्यिक संवाद होईल ? याची कल्पना केली आणि मला पटकन विंदा करंदीकरांची 'तुकोबाच्या भेटी शेक्सपिअर आला' ही रचना आठवली आणि त्या रचने प्रमाणेच मी ही एक कविता लिहून टाकली.

कविता तयार होती परंतु दोन्ही सृजनांचा एकत्र फोटो मिळवणे म्हणजे मोठी कसरत! सुदैवाने या दोन महानुभावांना मागील आठवड्यात एकत्र ऐकणे आणि या दोघांचा एकत्र फोटो मिळाला आणि माझ्या कवितेची प्रतीक्षा संपली! गुरुवर्य श्री बाबाराव मुसळे सर आणि गुरुवर्य प्रा.इंद्रजित भालेराव सरांच्या फोटोसह ही कविता इथे देत असून नक्कीच ही रचना आपल्याला आवडल्याशिवाय राहणार नाही! पुन्हा एकदा दोन्ही गुरुजींच्या चरणी नतमस्तक होऊन दोघांनाही उदंड आयुरारोग्य चिंतीतांना दोघांच्या हातून उत्तरोत्तर मायमराठीची लेखन सेवा अखंड घडून येवो!




**इंद्रजिता भेटी बाबाराव आले।**

इंद्रजिता भेटी । बाबाराव आले ।
हृदय निमाले ।एकामेकी ॥१॥
झाली गळा भेट ।राम कृष्ण हरी ।
झाली सुरूवारी ।दंडवत ॥२॥
इंद्रजीत बोले ।दुध देई तुव्हा हाल्या ।
गाई घरा आल्या ।मह्या जव्हा ॥३॥
बोले बाबाराव ।तू शब्द जादूगार ।
हिरवा शिवार ।साहित्याचा ॥४॥
ऐशी झाली भेट ।भारत रामाची।
काळजाशी खोल ।लेखणीच्या ॥५॥
आम्ही भाग्यवान ।करितो वाचन ।
वेचितो हे धन । अनमोल ॥६॥
एक चक्रधर ।दुजा तुकाराम।
सजविती धाम ।ग्रंथो ग्रंथी ॥७॥
एक मराठवाडी माती ।दुजा खाण विदर्भाची ।
पेरिली शेतीमाती ।शब्दांकुर ॥८॥
विटेवरुनि देव । आला पटकन खाली ।
उराशी घेऊन दोघा।ज्योत ज्योतीत निमाली ॥९॥
अलौकिक सोहळा । भेट अक्षर आनंद ।
हृदयी कौतुक वाहे ।ओसंडून ॥१०॥
विठ्ठल म्हणे सारी ।लेखन पंढरी व्यापली।
वारी ही झळाळली ।शब्दानंदी ॥११॥

# शिक्षणाचे माहेरघर पुणे ड्रग्जच्या विळख्यात !

आधुनिक केसरी

राजू जाधव, मांगूर, जि. बेळगाव

शिक्षणाचे माहेरघर म्हणून पुण्याची ओळख आहे मात्र आता पुणे ड्रग्ज हाऊस होण्याची भीती व्यक्त केली जात आहे कारण मागील काही दिवसांपासून पुण्यात करोडो रुपयांचा गांजा जप्त करण्यात आल्याचे वृत वाचनात आले विशेष म्हणजे यात ताब्यात घेण्यात आलेले अनेक आरोपी महाविद्यालयात शिक्षण घेणारे आहेत त्यामुळे संपूर्ण शैक्षणिक क्षेत्रातून चिंता व्यक्त केली जात असून निश्चितच ही बाब खेदजनक म्हणावी लागेल शिक्षणाचा आसरा घेवून जर विद्यार्थी असले उद्योग करत असतील तर त्यांना वेळीच रोखले पाहिजे. अशातचं गडचिरोली जिल्ह्यातून गांजा विक्रीसाठी आलेल्या ३ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पुणे गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पुणे - अहमदनगर रोड परिसरातून अटक केली असून त्यांच्याकडून ११ लाख ७० हजार रुपये किंमतीचा ५६ किलो गांजा जप्त करण्यात आले आहे तसेच काही दिवसांपूर्वी १ कोटी १४ लाख रुपये किंमतीच्या एलएसडी स्ट्रिप्स उच्चशिक्षित विद्यार्थ्यांकडून जप्त करण्यात आल्या होत्या पार्टी आणि इतर शौक पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या पैशासाठी थेट ड्रग्ज विक्रीचा व्यवसाय करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे अंमली पदार्थ पोहोचवण्यासाठी चक्क फूड डिलिव्हरी ॲपचा वापर करत असल्याचेही पोलीस तपासात पुढे आले आहे.

हेरॉईन हे मॉर्फिनपासून तयार केलेले एक ओपिओइड औषध आहे. जे अफूच्या खसखस वनस्पतीपासून मिळते. हे सामान्यतः पांढरे किंवा तपकिरी पावडर स्वरूपात मिळते. "ब्लॅक टार हेरॉईन" म्हणून देखील याला ओळखले जाते. हे दिसायला अगदी वितळलेल्या कॅटबरी सारखे असते. हेरॉईन अत्यंत व्यसनाधीन असून याची लवकर लत लागते. याचे सेवन इंजेक्शन, किंवा धूम्रपान स्वरूपात केले जाते. हे आनंद, वेदना आराम आणि विश्रांतीची भावना निर्माण करते. मात्र यामुळे शारीरिक तसेच मानसिक त्रास होतो. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थांमध्ये प्रामुख्याने मेफेड्रोन, हेरॉईन, सिरपच्या बाटल्या, एलएसडी, हायड्रोपोनिक विड, चरस आणि गांजाचा सामावेश आहे ज्यांच्या हातात उद्याचे भविष्य घडवणार आहेत त्यांच्याचं हातात असले ड्रग्जरुपी अमली पदार्थ सापडणे निश्चितच खूप वेदनादायी आहे आई - वडील काबाड कष्ट करुन शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च करतात मात्र मुले शिक्षणाच्या नावाखाली असली गैरकृत्ये करुन संपूर्ण शिक्षण क्षेत्राला काळीमा फासतात आशांच्या योग्यवेळी मुसक्या आवळल्या पाहिजेत तरचं कुठेतरी विद्यार्थ्यांना आळा बसेल !



# छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश नोंदणीसाठी उत्तम प्रतिसाद

## उमेश नागदेवे सहसंचालक छत्रपती संभाजीनगर यांनी केले समाधान व्यक्त

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता पॉलिटेक्निक प्रवेशासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर दिनांक १ जुन २०२३ पासून नाव नोंदणी सुरु झाली आहे. विद्यार्थी व पालकांना प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती मिळावी तसेच ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मदत व्हावी यासाठी संचालनालयाने सुविधा केंद्राची स्थापना केली आहे. या सुविधा केंद्रावर विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणे कागपत्र अपलोड करणे सर्व विद्याशाखांची माहिती, त्यांचे मागील वर्षाचे कट-ऑफ, प्रवेशासाठी लागणारे कागपत्रांची माहिती विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या सर्व शिष्यवृत्यांची माहिती तसेच पॉलिटेक्निक अभ्यासक्रम पूर्ण केल्यांनतर ब्रँच निहाय भविष्यातील संधी इत्यादी बाबत सविस्तर समुपदेशन केले जाते छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक कांचनवाडी पैठण रोड छत्रपती संभाजीनगर (एफ सी क्रमांक- २१७६) हे पॉलिटेक्निक प्रवेशासाठी शासनाचे मान्यता प्राप्त सुविधा केंद्र आहे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे सहसंचालक उमेश नागदेवे यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली. पॉलिटेक्निक प्रवेशा संदर्भात सहसंचालक स्वतः जातीने लक्ष देत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ते छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकला त्यांनी भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी विद्यार्थी, पालक व सुविधा केंद्रातील स्टाफ यांच्याशी संवाद साधला त्यावेळी विद्यार्थी व पालकांनी सांगितले की छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक मधील सुविधा केंद्रावर सर्वोतोपरी मोफत मार्गदर्शन व नाव नोंदणीसाठी मदत केली जाते. तसेच या तंत्रनिकेतनमधील उपलब्ध सोयी सुविधा बाबत समाधान व्यक्त केले.



आतापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी या सुविधा केंद्रावर येऊन पॉलिटेक्निक प्रवेशासाठी नाव नोंदणी केली आहे. या बद्दल सहसंचालक उमेश नागदेवे यांनी समाधान व्यक्त केले.

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमधील उत्तीर्ण होणारे विद्यार्थी दर वर्षी विविध नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या पदावर रुजू होतात. येथील वैविध्य पूर्ण शिकवण्याची पद्धत, अद्यावत लॅबोरेटरीज, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, भव्य क्रीडांगण, स्वच्छ व नैसर्गिक वातावरण यामुळे येथील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व ते खात्रीशीर उच्च शिक्षण किंवा चांगल्या नोकरीवर हजर होतात.

येथे उपलब्ध असलेल्या सुविधा केंद्र व मार्गदर्शन केंद्राचा विद्यार्थी तसेच पालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन कॉलेज चे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष रणजित मुळे, संस्थेचे सचिव पद्माकर मुळे व प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी सर्व उत्तीर्ण व प्रवेशइच्छुक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.



# साई पर्ल स्पोर्ट्स क्लबच्या क्रिकेट स्पर्धेचे बक्षिस वितरण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** येथील पिंपळे सौदागर परिसरातील साई पर्ल स्पोर्ट्स क्लबच्या वतीने आयोजित साई पर्ल प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. लहान मुले, युवावर्ग , महिला आणि ज्येष्ठ नागरिक अशा चार गटांमध्ये साई पर्ल सोसायटीच्या मैदानावर रंगलेल्या या स्पर्धांमध्ये पासष्ट वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक खेळाडूंनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. उतारवयातील ज्येष्ठांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. श्रीकांत माने यांच्या नेतृत्वाखाली अनिल कुलकर्णी, सुरेंद्र राणे, प्रभाकर बोमिडवार, लक्ष्मण सुमय्या, निकेश कुमार, बाबुराव जाधव यांनी तर कमलेशभाई शहा यांच्या नेतृत्वाखाली राजकुमार आगरवाल, अरविंद माने, चंद्रकांत पवार, प्रथ्विराज चौधरी, राजेश गुप्ता या खेळाडूंनी उत्तम कामगिरी बजावली. या दोन गटात झालेल्या स्पर्धेत कमलेशभाई शहा यांच्या टीमने विजय मिळवला. लहान मुलांच्या गटात के. सोहन, युवा गटात अमीत रुपारेलिया आणि महिला गटात रिना धमेचा यांच्या गटाने प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत विजय मिळवले. यशस्वी स्पर्धकांना सोसायटीतील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

# रंगतदार सोहळ्यात शब्दरंगचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** येथील ख्यातमान कवी हेमंत जोशी यांच्या विविध रंगांनी नटलेल्या 'शब्दरंग' ह्या एका वेगळेपणाने मांडणी केलेल्या काव्यसंग्रहाचे 'ग्रंथाली' तर्फे काल १८ जूनला प्रकाशन झाले. प्रमुख अतिथी अविनाश कोल्हे, अध्यक्ष राजीव श्रीखंडे, जेष्ठ कवी चंद्रशेखर सानेकर, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि निवेदिका डॉ. लतिका भानुशाली आणि साहित्य, कला, जाहिरात, उद्योगअशा विविध क्षेत्रातल्या मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा 'प्रतिभांगण' येथे संपन्न झाला. रंगतदार भाषणांनी, कविता, शेर सादरीकरणांनी आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ह्या सोहोळ्याला एक सुंदर वळण मिळाले.





# विद्यार्थी काँग्रेस तालुकाध्यक्षपदी विठ्ठल पाटील धोंडगे

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेस पक्षाचे सक्रिय यूवा कार्यकर्ते विठ्ठल पाटील धोंडगे याची अखील भारतीय विद्यार्थी काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष म्हणून फेरनिवड करण्यात आली आहे. #तालूक्यात गेली अनेक वर्षांपासून कॉंग्रेस पक्षात सक्रिय सहभागी असलेले सामाजिक यूवा कार्यकर्ते श्री.धोंडगे यांनी अखील भारतीय विद्यार्थी काँग्रेस पक्षाचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी परिश्रम घेतले आहेत.विविध विधायक कार्यक्रम घेऊन जनजागृती केली आहे.पक्षाप्रतीअसलेली निष्ठा लक्षात घेऊन माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी अखील भारतीय विद्यार्थी काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष म्हणून फेरनिवड करण्यात यावी असा आदेश दिल्याने.भा.वि.कांग्रेसचे जिल्हा अध्यक्ष शशीकांत निळकंठ क्षीरसागर यांनी सदरील फेरनिवडीचे लेखी पत्र दिले आहे. फेरनिवड होताच पंचक्रोशीतील विविध स्तरातुन अभिनंदन केले जात आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण आणि इतर पदाधिकारी यांनी माझ्यावर विश्वास ठेवून फेरनिवड केली आहे.यापुर्वि मी एकनिष्ठ राहून पक्षाला बळ देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली यापूढे या कामात कसलीच कूचराई न करता संवगड्याना सोबत घेऊन युवकांना प्रोत्साहन देऊन पक्षाची ध्येयधोरणे सामान्य तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी परिश्रम घेतले जाईल अशी ग्वाही श्री.धोंडगे यांनी दिली आहे.

# अंतर्मनात डोकावून पहा, कविता मिळेल : डॉ. मधुसूदन घाणेकर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कवी कवयित्रींनी अंतर्मनात डोकावून पहावे ,त्यात मिळेल पहायला जीवनाचे प्रतिबिंब, स्वप्न, आठवणी आणि त्यातूनचहाती येईल शाश्वत काव्य. या निर्मितीसाठी सतत चिंतनमनन, व्यासंग हवा. आपली पंचज्ञानेंद्रिये जागरुक ठेवून सृजनशीलता वाढवावी, असे प्रतिपादन पहिल्या विश्व काव्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी केले. 'मधुरंग ' संस्था आयोजित खुल्या काव्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. मधुसूदन घाणेकर बोलत होते.याप्रसंगी कार्याध्यक्ष मंदाताई नाईक, तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या संस्थापक-अध्यक्ष प्रिया दामले, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजय साखरे, लाफ इंटरनॅशनल. च्या कार्याध्यक्ष ॲड.ज्योती लिमये,काव्यशिल्प.चे माजी अध्यक्ष शिवाजी उराडे तसेच ऋचा कर्वे, आदि मान्यवर उपस्थित होते.डॉ. मधुसूदन घाणेकर संपादित 427 व्या डहाळी विशेषांकाचे अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

प्रिया दामले यांना काव्य चळवळीतील मौलिक योगदानासाठी डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते 'मधुरंग इंटरनॅशनल काव्यगौरव पुरस्कार 2023' प्रदान करण्यात आला. मधुरंग.च्या निमंत्रक प्रतिमा अरुण काळे आणि राजश्री वाणी मराठे यांनी , सदर सलग 6 तास रंगलेल्या काव्ययाग सोहळ्याचे सूत्रसंचालन केले.या सोहळ्यात सुमारे 75 कवीकवयित्रींनी काव्य सादरीकरण केले.तारा चौधरी, डॉ.मीरा सुंदरराज, योगेश हरणे,चंद्रकांत जोगदंड, ॲड.संध्या गोळे, जयंत हिरे, अश्विनी पिंगळे, दीपाराणी गोसावी,बाबा ठाकूर, योगिता कोठेकर, रविन्द्र गाडगीळ, शलाका गाडगीळ आदिंच्या कविता विशेष गाजल्या.तसेच या काव्ययागामधे 'माझा काव्यप्रवास ' विषयक कवी कवयित्रींनी आपली मनोगते अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केली.या काव्ययागाचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन घाणेकर यांनी उत्तरार्धात, त्यांच्या आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त गीत-गझल-कवितांचे सादरीकरण करुन उपस्थितांची मने जिंकली. मंदाताई नाईक यांच्या शुभहस्ते डॉ.घाणेकर यांचा जाहिर सत्कार करण्यात आला.डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते मान्यवर कवी कवयित्रींना काव्यगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले.






# NEET-2023 मधील सुपर हीरोजचा भव्यदिव्य सत्कार

## आयआयबीतील गुणवंतांच्या गौरवाने मिळाली भावी डॉक्टरांना प्रेरणा

THINK NEET | THINK IIB
महाराष्ट्राचा महाब्रँड
IIB
SINCE 1999
www.iibedu.com



आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** मागील तब्बल 24 वर्षांपासून डॉक्टर आणि इंजिनिअर घडविणारी फॅक्टरी आणि महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड म्हणून नावलौकिक असलेल्या आयआयबी इन्स्टिट्यूटने NEET-2023 मध्येही दैदिप्यमान निकाल दिला आहे. यानिमित्ताने या गुणवंत विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक व्हावे तसेच आगामी काळात डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक या उदात्त हेतूने NEET-2023 मध्ये अलौकिक यश प्राप्त केलेल्या आयआयबीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शॉल, सन्मानचिन्ह आणि त्यांच्या पुढील शिक्षणासाठी उपयोगाला येईल यासाठी रोख रकमेच्या बक्षिसासह सहकुटुंब सन्मान करण्यात आला.

आयआयबी इन्स्टिट्यूटच्या वतीने शहरातील मधुमीरा फंक्शन हॉल येथे रविवार, दि. 18 जून रोजी गुणवंत सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होता. यावेळी व्यासपीठावर आयआयबी इन्स्टिट्यूटचे सर्वेसर्वा दशरथ पाटील, संचालक प्रा. चिराग सेनमा, कोल्हापूर शाखेचे संचालक एस. एन. सेनमा, आयआयबी पीसीबी हेड प्रा. वाकुडे पाटील सर, नरेश भोसले सर, बालाजी कदम सर, शेख सर, मिरकले सर, रवी सौदागर सर, लोहारे सर आदी मान्यवरांसह टीम आयआयबीची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. दरम्यान, नुकत्याच जाहीर झालेल्या NEET-2023 परीक्षेच्या निकालात उत्तुंग यशाची झेप घेत नीट मध्ये उत्तुंग यश मिळविले आहे. यामध्ये आयआयबीचे क्लासरूम स्टुडंट असलेल्या पलक जाजू, आयआयबी-आधारच्या विद्यार्थिनी सायली महिंद्रकर आणि पलक शहा या विद्यार्थिनींनी 720 पैकी 705 गुण प्राप्त केले. तसेच आयआयबीच्या भारती देशमुख 696, शिवम माहूरे 700, ज्ञानेश्वर जाधव 700, साक्षी वजिरगावे 700, अर्जुन लिंगदळे 700, उझेर रुलानी 697, अनुष्का भारसवाडकर 696 यांनीही उत्तुंग यश संपादन केले. याशिवाय अनेक विद्यार्थ्यांनी NEET-2023 मध्ये घवघवीत यश संपादन करत MBBS शिक्षणाकडे एक पाऊल पुढे टाकले आहे. तरी या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक व्हावे तसेच आगामी काळात डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक या उदात्त हेतूने NEET-2023 मध्ये अलौकिक यश प्राप्त केलेल्या आयआयबीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शॉल, सन्मानचिन्ह आणि त्यांच्या पुढील शिक्षणासाठी उपयोगाला येईल यासाठी रोख रकमेच्या बक्षिसासह सहकुटुंब सन्मान करण्यात आला. यावेळी गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक, टीम आयआयबी, आयआयबीमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**PCB मध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवून देणारे आयआयबी इन्स्टिट्यूट**

फिजिक्स विषयात पलक जाजू, उझेर रुलानी, सर्वेश हटकर, रामप्रसाद पाटील, सायली कदम, हाफिज सोहेल या सहा विद्यार्थ्यांनी 180 पैकी 180 गुण मिळविले आहेत. केमिस्ट्री विषयात सायली महिंद्रकर आणि तेजस पोरे यांना 180 पैकी 180 गुण मिळविले आहेत. तर बायोलॉजी विषयात भारती देशमुख, ज्ञानेश्वर जाधव, अक्षय मिसाळ, गणराज नल्लावार आणि शिवानी जाधव या पाच विद्यार्थ्यांनी 360 पैकी 360 गुण मिळविले आहे.

NEET-2023 मध्ये उज्ज्वल प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत तर घेतलीच त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या या यशात टीम आयआयबीचे फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी विषयांच्या तज्ज्ञ प्राध्यापकांचाही मोलाचा वाटा आहे. तरी आयोजित भव्य सन्मान सोहळ्यात आयआयबी पीसीबी टीमचाही सत्कार करण्यात आला. याशिवाय आयआयबी इन्स्टिट्यूटच्या व्यवस्थापनाचेही काटेकोरपणे केलेल्या नियोजनाचाही या यशात मोलाची भूमिका असल्याने या सन्मान सोहळ्यात टीम आयआयबी व्यवस्थापकांचा सत्कार करण्यात आला.



# कचरापट्टी हटवण्याकरता आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** नगरपंचायत ने टाकलेला कचरा व अवैधरित्या बनवलेली कचरा पट्टी तात्काळ हटवण्याकरिता नागरिकांचे तीव्र धरणे आंदोलन आज दि.19 जून रोजी फुलंब्री नगरपंचायत च्या विरोधात नागरिकांनी तीव्र स्वरूपाचे धरणे आंदोलन नगरपंचायत ने केलेल्या अवैधरीत्या कचरा पट्टी तात्काळ हटविण्यात यावी याकरिता दि. 16 जून 2023 रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जनावरे हे डोंगरावरती चरण्यासाठी गेले की तेथील मोकाट कुत्रे हे त्या जनावरावर हल्ला करून त्यांना जिवे मारून टाकतात व त्यांना घराकडे वापस येऊ देत नाही असे कित्येक जनावरे या मोकाट कुत्र्यांनी त्या कचरापट्टीमुळे फाडून खाल्ले आहेत.

तेथे माणसांनाही जाण्याची भीती वाटते असे कित्येक लोकांचे या कचरापट्टीवर कुत्र्यांनी लचके तोडलेले आहेत आम्ही नागरिक वेळोवेळी या घटनेची नगरपंचायत कार्यालय यांना वेळोवेळी माहिती पत्राद्वारे व निवेदनाद्वारे कळवित असतो परंतु नगरपंचायत कार्यालय यावर कोणतीही कठोर भूमिका घेत नसून नगरपंचायत फुलंब्री नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचे काम करीत आहे या कचरा पट्टीमुळे आम्हा नागरिकांना आमच्या स्वास्थ्याची काळजी वाटू लागली आहे आमच्या आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधीमुळे आम्हा फार त्रास सहन करावा लागत आहे ही अवैधरीत्या कचरा पट्टी तात्काळ हटवून वैद्य जागेवर घेऊन जाण्यात यावी याकरिता आज आम्ही फुलंब्री चे नागरिक फुलंब्री कचरा डेपो येथे तीव्र प्रकारचे आंदोलन केलेले आहे त्यामुळे नगरपंचायतने आम्हास लेखी आश्वासन दिले आहे की सदर प्रकरणी पंचनामा करण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने नगरपंचायत चे कचरा डेपो करिता नवीन स्थळ निश्चित केले असून सदर स्थळी येत्या 30 दिवसात कचरा टाकने बाबतचे काम सुरू होईल कचरा डेपोरील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येऊन सदर कचरा लवकरात लवकर नष्ट करण्याबाबत कारवाई करण्यात येईल तसेच मोकाट कुत्र्यांसंबंधी योग्य ती कारवाई करण्यात येईल असे लेखी आश्वासन नगरपंचायत अधिकारी नगरपंचायत फुलंब्री श्री महेंद्र जमधडे यांनी नागरिकांना दिले.

यावेळी सर्व गुंजाळवाडीतील सर्व मान्यवर उपस्थित होते यावेळीः मंगेश गुंजाळ भगवान गंगावणे मैना जी गुंजाल गणेश गुंजाल प्रकाश गुंजाळ सोमीनाथ गुंजाळ गणेश गुंजाळ महेश गुंजाळ शुभम गुंजाळ सचिन गुंजाळ देवचंद गुंजाळ सुनील गुंजाळ भारत गुंजाळ कैलास गुंजाळ ज्ञानेश्वर गुंजाळ किशोर गुंजाळ दत्ता गुंजाळ किसन गुंजाळ खेमचंद गुंजाळ कादर शेख लोकमान शेख समीर शेख सुभान शेख अलीम शेख तय्यब पटेल. सुदेश गुंजाळ विकास गुंजाळ राहुल गुंजाळ नितीन गुंजाळ जगन प्रधान. यावेळी गुंजाळवाडी चे ग्रामस्थ उपस्थित होते

# पोलीस सांगून लोकांची करायचा लूटमार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात सध्या धुळे मध्यवर्ती बस स्टैण्ड येथे एक संशयित इसम हा पोलीस असल्याची बतावणी तोतयागिरी करून बस स्थानक वरील प्रवासी लोकांचे मौल्यवान सोने चोरून नेल्याची माहिती मिळून आली होती. त्या अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक श्री. संयज बारकुंड सो. यांनी धुळे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना प्रतिबंध करणे व गुन्हे उघडकिस आणण्याकामी सूचित व आदेशीत केले होते..

त्यावरून पोलीस निरीक्षक श्री आनंद कोकरे यांचे सूचनाप्रमाणे धुळे शहर पोलीस ठाण्याचे शोध पथकातील अंमलदार यांनी धुळे शहरातील मध्यवर्ती बस स्थानक आवारातून CCTV फुटेज च्या सहाय्याने संशयित भिकन पंडीत शर्मा वय- ५६ वर्ष, रा. तलाव गल्ली, ता. पारोळा जि.जळगाव यास ताब्यात घेवून अधिक विचारपूस करता त्याने गुन्हयाची कबूली दिलेली आहे. त्याचेकडून ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे टोंगल जप्त करण्यात आलेले आहेत. नमूद आरोपीतावर अश्याचप्रकारचे गुन्हे यापूर्वी ता. चोपडा जि. जळगाव येथे दाखल असले बाबत तपासात पुढे आलेले आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक संजय बारकुंड सो., मा. अप्पर पोलीस अधिक्षककिशोर काळे सो. मा. उपविपी अधि श्री ऋषीकेश रेड्डी, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, प्रशांत रोठोड शोध पथकाचे अंमलदार पोहेकॉ मच्छिद्र पाटील, पोकों प्रसाद बाघ, निलेश पोतदार, गुणवंतराव पाटील, ज्ञानेश्वर सांळुंखे, वैभव वाडीले, विशाल सुर्यवंशी अशांनी केलेली आहे.

9130174444
हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# राष्ट्रवादीने साजरा केला गद्दार दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिंदे फडणवीस सरकारच्या विरोधामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने खोके दिवस/ गद्दार दिवस म्हणून साजरा केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष श्री रणजीत राजे भोसले यांच्या नेतृत्वामध्ये महात्मा गांधी पुतळा येथे घोषणा देऊन आंदोलन करण्यात आले. शिंदे गटाने महाराष्ट्राशी केलेल्या गद्दारीला आज 20 जून रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे असा आरोप करीत खोके वीरांच्या वर्षपूर्ती निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस आज गद्दार दिवस /खोके दिवस मनवीत आहे असे राष्ट्रवादी ने जाहीर केले. जनतेच्या मनात असणारे लोकप्रिय ठाकरे सरकार रात्रीच्या वेळेस गद्दारी करून पाडण्यात आले. सुरत,गुवाहाटी,गोवा मार्गे जाऊन महाराष्ट्राच्या जनतेचा अपमान केला आहे.याचा निषेध म्हणून धुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आज महात्मा गांधी पुतळ्याजवळ आंदोलन व घोषणा देऊन त्यांचा धिक्कार व निषेध व्यक्त केला आहे. यावेळी "50 ओके, एकदम ओके" "महाराष्ट्र त्रस्त,गद्दार मस्त" "खाऊन खोके, माजलेत बोके" "गद्दार हटाव, महाराष्ट्र बचाओ" अशा प्रकारच्या घोषणा देण्यात आल्या.आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनाला रणजीत राजे भोसले, कुणाल पवार, महेंद्र शिरसाठ, राजू चौधरी, उमेश महाजन, गोरख शर्मा, दीपक देवरे, डी.टी.पाटील, राजू सोळंकी, दीपक देसले, एजाज शेख, भानुदास लोहार,राजेंद्र सोलंकी, चेतन पाटील, भूषण पाटील, सरोज कदम, संगीता खैरनार, वंदना केदार, किरण सूर्यवंशी, शेख समद, मसूद अन्सारी, फिरोज पठाण, मंगला मोरे, भीका नेरकर, निखिल मोमया, भटू पाटील, स्वामींनी पारखे, जगन ताकटे, संजय नेरकर, मनोज कोळेकर, दानिश पिंजारी, रामेश्वर साबरे आदि कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# नदीवरील पुलाचे काम केव्हा होणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**खेड :** जिल्हा रत्नागिरी, गाव पुरे बुद्रुक नदीवर पुलाचा भुमिपुजन करुन आठ महीने झाले. जेव्हा भुमिपूजन केले तेव्हा स्थानिक आमदार यांनी ग्रामस्थांना विश्वास दिला होता की मार्च पर्यंत पुलाचा काम पुर्ण करुन देतो, तरी अजुन पुलाचा काम पुर्ण झाले नाही. आता पावसाळा सुरुवात झाली ग्रामस्थांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. शाळेतील विद्यार्थी नदीच्या पलीकडे जाणार कसे ? काजवे पुल मार्ग होता तो बांधकाम अधिकारी व ठेकेदार यांनी तोडला आणि पुलाचा सर्वे बदलुन काजवेवर पुलाचा बांधकाम सुरू केला तेव्हा ग्रामस्थांनी विरोध केला असता बांधकाम अधिकारी व ठेकेदार यांनी ग्रामस्थांना सांगीतले तुम्हाला मार्च मध्ये पुलाचा काम पुर्ण करुन देतो अजुन कश्याचा काही ठावठिकाणा नाही. फक्त ग्रामस्थांची फसवणूक केली आहे. आता पुरे बुद्रुक संपुर्ण गाव, गावातील वाड्या, बौध्द वाडी, धनगर वाडी, आदिवासी वाडी, ग्रुप ग्रामपंचायत तीन गाव, शिग्रारी पुरे खुर्द आठ गाव, आरोग्य उप केंद्र ही सर्व लोक नदीवर पुल नसल्याने वंचित राहणार आहेत. ग्रामस्थांनी बांधकाम आफीस मध्ये वारंवार तक्रार देऊन सुध्दा दखल घेतली गेली नाही. विद्यार्थ्यांनी शाळेत जायचे कसे ? गावातील एकादी व्यक्ती आजारी पडली आणि त्याला नदीच्या पलीकडे हॉस्पिटलपर्यंत पोचवता आले नाही तर लोकांनी काय करायचे आणि काय झाले तर त्याला कारणीभूत कोण ? म्हणून लवकरात लवकार ग्रामस्थांची आणि शाळेतील विद्यार्थ्यांची या अडचणीतून सुटका करावी आणि महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाने यात आवर्जुन लक्ष घालावे.



# सावळदबारा येथे जि.प.शाळेची वाजली पहिली घंटा

## चिमुकल्यांची किलबिल, पहिलीच्या वर्गाला लेखन साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील केंद्र सावळदबारा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी जिल्हा परिषद शाळेत जय्यत तयारी केली होती.कुठे फुलांच्या पायघड्या, रांगोळ्या, तर कुठे ढोल-ताशांच्या गजर उन्हाळी सुटीनंतर दीड महिन्याने सोयगाव तालुक्यात पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक आणि खासगी अनुदानित शाळांची पहिली घंटा दि,१५/६/२३ गुरुवारी रोजी वाजली. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शिक्षकवृंद यांनी शाळेत जय्यत तयारी केली असून, कुठे फुलांच्या पायघड्या, रांगोळ्या, तर कुठे ढोल-ताशांच्या गजरात अभिनव पद्धतीने चिमुकल्यांचे स्वागत करण्यात आले आहे. एकीकडे पूर्व प्राथमिक शाळांमध्ये चिमुकल्यांची किलबिल... नवीन दप्तर... शाळेच्या दरवाजात प्रवेश करताना थोडीशी भीती... हुरहुर असणारी लहान मुले, तर दुसरीकडे प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये मित्र-मैत्रिणींना भेटण्याची लागलेली ओढ, मजा मस्ती... असे काहीसे चित्र सावळदबारा परिसरात शाळांमध्ये पाहायला मिळाले आहे. राज्य शासनाने यंदाच्या आहेत. शैक्षणिक वर्षांपासून दप्तरांचे ओझे कमी करण्यासाठी पहिली ते आठवीच्या पुस्तकांमध्ये वह्यांची पाने जोडण्याचा अभिनव प्रकल्प राबविला आहे. एकत्रित विषयानुरूप एकात्मिक पुस्तकांची निर्मिती केली आहे. वह्यांच्या पानांमध्ये कशा प्रकारच्या नोंदी करायच्या आहेत याच्या सूचना शिक्षकांना बालभारती कडून देण्यात आल्या आहे.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल राठोड यांच्या हस्ते दि.१९/६/२३ रोजी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना शाळेची बॅग,लेखन,व साहित्य वाटप करण्यात आले.व त्यांना मिठाई देऊन स्वागत करण्यात आले.याप्रसंगी सरपंच शिवगंगा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान, विठ्ठल राठोड मुख्याध्यापक, अनिल चव्हाण,शाळेय समितीचे अध्यक्ष जफर तडवी, शिक्षकवृंद भागवत गायकवाड,जे. के.गवई,निता हिरास मॅडम,मनोर तडवी, सुपाडा तडवी, सुभाष खराटे, पालकवर्ग, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोकर अल्पसंख्याक तालुकाध्यक्षपदी ताहेर बेग

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील तालुका काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्याक अध्यक्षपदी



मिर्झा ताहेर बेग याची निवड करण्यात आली आहे. शहरातील काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ असलेले ताहेरबेग हे मागील अनेक वर्षांपासून पक्षाच्या बळकटीसाठी सतत कार्यरत असतात त्यांच्या कार्याची दखल घेऊन अल्पसंख्याकचे जिल्हा अध्यक्ष अब्दुल शमीम यांनी निवड करण्यात आल्याचे लेखीपत्र दिले आहे. पक्षाचे अध्यक्ष मलीकार्जुन खर्गे ,प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या आदेशानुसार सदरील निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.पक्षानी दिलेली जबाबदारी मी निष्ठेनी पार पाडुन तालुक्यात पक्षाला बळ देण्यासाठी प्रयत्न करीन अशी ग्वाही बेग यांनी दिली आहे.



# सुंदर दातांसाठी आधुनिक उपचार : डॉ. मिहानी

## तंत्रज्ञानामुळे रुग्णांना तिसऱ्यांदा दात मिळणे झाले शक्य : डॉ शरद जुमडे

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** येथील सुप्रसिध्द डॉ. शरद जुमडे बुलढाणा इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा आणि टूथवर्क डेंटल लॅब नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा येथे दंतप्रत्यारोपणावर चर्चासत्राचे आयोजन दिनांक 18 मे हॉटेल नर्मदा येथे करण्यात आले दीप प्रज्वलन आणि धन्वंतरी पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा शाखेचे डॉक्टर शरद जुमडे होते नागपूर येथील नामवंत इम्प्लाँटोलॉजिस्ट डॉक्टर अमित मिहाणी यांनी कार्यक्रमाला मार्गदर्शन केले. नवीन तंत्रज्ञानामुळे रुग्णांना तीन दिवसात नवीन दात देणे शक्य झाले आहे.मनुष्याला नैसर्गिकरित्या दोन वेळा दात येतात दुधाचे दात व नंतर ते पडल्यावर कायमस्वरूपी दात येतात खाण्याच्या चुकीच्या सवयी सतत गोड खाणे यामुळे ते पडू शकतात पूर्वी दात पडल्यावर अर्धी किंवा पूर्ण कवळी बसवायचे नंतर त्याची जागा क्राऊन आणि बीज पद्धतीने घेतली यामध्ये आजूबाजूचे दात घासावे लागतात परिणामी ते कमजोर व सेन्सिटिव्ह होण्याची शक्यता असते दात नसलेल्या जागी टायटॅनियम या धातूचा इम्प्लांटस् स्क्रू बसविला जातो इम्प्लांट हाडांमध्ये स्थिर झाल्यानंतर तो दातांच्या मुळाप्रमाणे काम करतो आणि नंतर त्यावर अवॉटमेन्ट स्क्रू बसविला जातो व शेवटी त्यावर सिरॅमिक कॅप लावली जाते असे डॉ शरद जुमडे यांनी बोलताना सांगितले.म्हणजे "या तंत्रज्ञानामुळे रुग्णांना तिसऱ्यांदा दात मिळणे शक्य झाले आहे"याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ शैजल निरखे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ सचिन किनगे सेक्रेटरी यांनी केले.याप्रसंगी डॉ अमित मिहानी, डॉ निलेश जुमडे, डॉ खासबागे, डॉ आरती पाटील, डॉ अभिजित जाधव, डॉ चाथे, डॉ गवळी, डॉ राजपूत, डॉ गवळी, डॉ उमाळे, डॉ वाघ, डॉ दडॉ, डॉ जैस्वाल, डॉ कोठारी, डॉ सदावते, इतर मान्यवर डॉ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्स्लटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.




# दोन दिवसाआड पाणी द्या नाहीतर राजीनामे द्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिकेच्या गेटवर हंडा बजाव आंदोलन करण्यात आले या ठिकाणी आनंद लोंढे यांच्या नेतृत्वाखाली अनेक महिला व पुरुष आंदोलन करते यांनी घोषणाबाजी करून पालिकेचे सत्ताधाऱ्यांवर आरोप करण्यात आले. आतापर्यंत भाजप सरकारने खोटे आश्वासन देऊन धुळेकर जनतेला अक्कलपाडा पाण्यासंदर्भात पागल बनवण्याचा काम केले आहे असे आरोप करण्यात आले. सत्तेवर कंट्रोल ठेवणारे भाजपा शहराध्यक्ष अनुप अग्रवाल यांनी दिलेली आश्वासने भुलथापा ठरली आहे. ते खोटी आश्वासने जनतेला देत आहेत असा आरोपही करण्यात आला . आम्ही प्रशासनाशी बोललो असता, अजून पाच ते सहा महिन्यानंतर धुळेकरांना दिवसाआड पाणी मिळू शकते. परंतु भैय्या म्हणतात, दिवसाआड पाणी मिळेल. बाबा म्हणतात जुन अखेरीस पाणी येईल, त्यांना त्यांच्या आश्वासनावर इतका विश्वास असेल तर त्यांनी जुन अखेर धुळेकर जनतेला दिवसाआड पाणी देवू असे स्टॅम्प पेपरवर लिहून



द्यावे. आम्ही याआधी देखील आंदोलनासाठी बॅनर लावले. परंतु सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली ते काढण्यात आले. आमचे बॅनरही कोणी छापत नाही, त्यामुळे आम्ही महापालिकेच्या गेटसमोर रात्रीतून आंदोलनासाठीचा रस्ता रंगविला. येत्या पंधरा दिवसात दिवसाआड पाणी पुरवठा केला नाहीतर साखळी आंदोलन करू, असा इशारा दिला. आंदोलनात आनंद लोंढे, किरण गायकवाड, शंकर खरात, नयना दामोदर, पुनम शिरसाठ अनिल ठाकुर, रोहित सोनवणे, विक्की लोंढे, अमोल शिरसाट, निलेश जिरे आदी सहभागी झाले होते.

# भटक्या कुत्र्यांची कत्तल करण्याची परवानगी द्या

आधुनिक केसरी न्यूज

**कुन्नूर :** केरळमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत पसरली असून त्यांच्या हल्ल्यामुळे एका चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. तर, आजही एका मुलीवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याने ती गंभीर जखमी झाली आहे. भटक्या कुत्र्यांचा हा त्रास अधिक वाढू लागल्याने कुन्नूरच्या जिल्हा पंचायतीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. कुन्नूर येथे ११ जून रोजी ११ वर्षीय मुलावर काही भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला. या हल्ल्यामुळे मुलाचा जागीच मृत्यू झाला. असाच प्रकार गेल्यावर्षीही घडला होता.

यामध्ये १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला होता. गेल्या काही दिवसांपासून भटक्या कुत्र्यांचा त्रास शहरात वाढू लागला आहे, असे जिल्हा पंचायतीने याचिकेत म्हटले आहे. २०१९ मध्ये ५७९४ भटक्या कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ला केला होता. २०२० मध्ये ३९५१, २०२१ मध्ये ७९२७, तर, २०२२ मध्ये ११७७६ आणि १९ जून २०२३ पर्यंत ६२७६ भटक्या कुत्र्यांनी कुन्नूर जिल्ह्यांत नागरिकांवर हल्ले चढवले आहेत. तसंच, जिल्ह्यात जवळपास २८ हजार भटके कुत्रे असल्याचाही दावा या याचिकेतून करण्यात आला आहे. भटक्या कुत्र्यांचा त्रास कमी करण्याकरता स्थानिक पातळीवर बरेच प्रयत्न करण्यात आले आहेत.



# कनकशिळ येथे विविध कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कनकशिळ येथे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतून तसेच आमदार प्रशांत भाऊ बंब यांच्या मार्गदर्शनाखाली आज मौजे कनकशिळ येथे जल जीवन मिशन अंतर्गत पाणी टाकी व पाईपलाईन आदि कामांचे भूमिपूजन आज भाजपचे तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष संदीप निकम,सरपंच शोभाबाई बोडखे , उपसरपंच कासाताई म्हस्के ,विमलबाई कामठे, राम पोफळे, संदीप कामठे, सविता राणे, अनिल वाघ, चेअरमन संतोष कामठे ,व्हा.चेअरमन विनोद कामठे, साईनाथ बोडखे, विठ्ठल कामठे, आबाराव म्हस्के,अरुण राणे, हिरालाल वाघ, रशीद शेख,ज्ञानेश्वर दांडगे,तुळशीराम दांडगे,सचिन दांडगे, आदींसह गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# पाण्याची टाकी पाईपलाईनचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वडोद येथे आज केन्द्र सरकारच्या जलजीवन मिशनयोजनेअंतर्गत 1कोटी 12 लाख रू पाण्याची टाकी व पाईपलाईनचे भूमिपूजन सरपंच सुनिताताई चव्हाण ,व उपसरपंच शिवकन्या राहुल चव्हाण, याच्या हस्ते करण्यात आले या उद्घाटन प्रसंगी विलास चव्हाण, तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, राहुल चव्हाण, आशोक लग्गड, अरविंद चव्हाण, पुंडलिक चव्हाण, अरूण चव्हाण,अविनाश वेताळ, कानिफनाथ राऊत, साहेबराव मालोदे, हरिकिसन हाडके, ग्रामसेवक सोनवणे, तातेराव चव्हाण,राजेंद्र चव्हाण, गणेश चव्हाण, जगन देवकर, एकनाथ मालोदे, ज्ञानेश्वर बनकर, विलास चव्हाण माटरगाव, अमोल चव्हाण तसेच गावातील ग्रामपंचायत सदस्य व गावातील नागरिक उपस्थितीत होते.



# प्रलोभन दाखवून ३२ हजार रुपये लुबाडले

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** सध्याच्या इंटरनेट युगात जवळपास प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन असल्यामुळे ऑनलाइन व्यवहार ग्राहकांकडून होऊ लागले आहेत. त्यातच ग्राहकांची फसवणूक होण्याचे प्रमाणही वाढू लागले आहे. एका ऑनलाईन वस्तू विक्री करणाऱ्या कंपनीकडून १२ लाख ६० हजार रुपयांचे प्रथम बक्षीस मिळाल्याचे आमिष दाखवून करून एका महिलेची ३१ हजार ६४१ रुपयांची फसवणूक करण्यात आली.

याप्रकरणी, फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारकर्त्या महिलेच्या मोबाईलवर ३० सप्टेंबर २०२२ रोजी अज्ञात आरोपीने संपर्क साधला आणि तुम्हाला कंपनीकडून प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाल्याची माहिती दिली. त्या आरोपीने महिलेला कंपनीची लिंक व इतर माहिती व्हॉट्सॲपवर पाठवली. तिचा विश्वास संपादन करून रजिस्ट्री फी म्हणून ३५०० रुपये भरण्याची सूचना केली. त्यानंतरच तुमच्या खात्यावर १२ लाख ६० हजारांचा चेक जमा होईल. टीडीएस भरल्याशिवाय चेक खात्यामध्ये जमा होणार नाही, असे आरोपीने महिलेला सांगितले. मोबाईल क्रमांक धारकाने स्वतःचे नाव पंकज सिंग भारतीय असे सांगितले.



# बिहारहून निघालेल्या अल्पवयीन युवतीला समतोलचा आधार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** दि १७ जून रोजी रोजगारासाठी सुरतला गेलेला भाऊ गेल्या अनेक महिन्यापासून घरी न आल्यामुळे बिहार मधील एक अल्पवयीन मुलगी भावाला भेटण्यासाठी बिहार मधून थेट एका मालवाहतूक ट्रक द्वारे सुरतकडे जायायला निघाली. मात्र हा ट्रक जळगावपर्यंतच असल्यामुळे ती जळगावातच उतरली. बिहार राज्यातील अधोरा जिल्यातील ही १७ वर्षाची युवती आहे. ट्रक चालकाने तिला जळगावतच उतरून दिल्यामुळे तिच्या जवड पैसे नव्हते, आता पुढचा प्रवास करायचा कसा, असा प्रश्न होता. दिवसभर जळगाव मध्ये फिरूनही भाड्यापुरते पैसे जमले नव्हते. शेवटी सुरतला कसे जायायचे असे नागरिकांना विचारत विचारत ती रेल्वे स्टेशन जळगाव येथे पोहचली, मात्र युवती एकठी असल्याचे पाहून काही टवाळखोर तिच्या मागे लागले होते. काही मुलांनी सहज हेरले आणि तिची छेड काढायला सुरुवात केली . मात्र केशव स्मुर्ती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्प हा 0 ते १८ वर्षा आतील हरविलेल्या, अनाथ, बेघर व काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या मुलांसाठी २४ तास ही संस्था रेल्वे स्टेशनवर सेवाकार्य करीत आहे .या संस्थेचे कर्मचारी अश्याच 0 ते १८ वर्षा आतील मुलांच्या शोध घेत रेल्वे स्टेशनवर आउटरिच करीतच असतात. आउटरिच करीत असतांना समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक श्री. प्रदिप पाटील यांना ही मुलगी प्लॅट फॉर्म क्र.२ वर घाबरलेल्या अवस्थेत एकटीच बसलेली दिसली व हे टवाळखोर मुले तिच्या अवती- भोवती फिरत असल्याचा प्रकार तात्काळ प्रदिप पाटील यांचा लक्षात आला. हे मुलीजवड पोहचताच तात्काळ ते टवाळखोर पळाले. प्रदिप पाटील यांनी कुठला ही विलंब न लावता ताबडतोब त्या मुलीला ताब्यात घेतले व आपल्या ऑफिस ला आणून समतोल प्रकल्पाचे कर्मचारी प्रदिप पाटील (व्यवस्थापक), टीम सदस्य विश्वजित सपकाळे , रविना भगत यांनी त्या मुलीचे समुपदेशन करत मुलीला आपलेसे करत सोबत येण्यासाठी प्रोत्साहित करून grp ला नोंद करत वेद्यकीय तपासणी करून बालकल्याण समितीच्या आदेश्याने काळजी व संरक्षणासाठी बालगृहात दाखल केले. जळगाव बालकल्याण समितीच्या आदेशाने मुलीला आई वडिलांकडे सुपूर्द करण्यात येणार आहे.

# पांढरकवडा येथे हायप्रोफाइल जुगार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** पांढरकवडा येथील पारवा रोडवरील संतोषी मंदिरालगत एका घरात सुरू असलेल्या हायप्रोफाइल जुगार अड्ड्याचे घबाड पोलिसांच्या हाती लागले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने येथे केलेल्या कारवाईत २२ प्रतिष्ठीत नागरिकांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १८ लाख ११ हजार ५०० रुपयांची रोकड, मोबाइल, कार असा एकूण ५८ लाख ४४ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे पांढरकवडा येथे खळबळ उडाली आहे.जुगारप्रकरणी पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.




# वैजापुरात वंचितचा आक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** दलित व अल्पसंख्याक समाजातील पाच जणांची वेगवेगळ्या ठिकाणी जातीय द्वेषभावनेतून निर्घृण हत्या करण्यात आली. राज्यसरकारने या हत्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमूण दोषींवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी सोमवारी सकाळी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर वंचित बहुजन आघाडी व आंबेडकरी समाज बांधवांनी आक्रोश मोर्चा काढला.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र शिरसाठ, वंचित बहुजन युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष गौतम जाधव, शहराध्यक्ष जाकीर पठाण, तालुकाउपाध्यक्ष अंकुश पठारे, किरण पवार, प्रवीण शिंदे, पिंटू भोसले,राजवीर त्रिभुवन, राहुल साळवे, सरफराज शेख, अरुण सोनवणे , फैय्याज सौदागर , प्रमोद सातुरे, रंभाजी आल्हाट, अरुण साळवे, दिगंबर साळवे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातून उपविभागीय अधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा नेण्यात आला.राज्यातील नांदेड येथे अक्षय भालेराव, शहिद झरीन खान (जि. बिड, परळी) शबाना पटेल (जि. छ. संभाजीनगर, कन्नड)गिरीधर तपपाले ता रेणापूर जि. लातूर,हिना मेश्राम अकोला अशा लागोपाठ पाच ठिकाणी दलित अल्पसंख्याक समाजातील युवक युवतीचा जातीय द्वेषभावनेतून हत्या करण्यात आली. पुरोगामी महाराष्ट्रात कालिमा फासणाऱ्या प्रकारावर राज्यशासनाच्या गृह विभागाने या हत्याकांडातील दोषींवर कडक कारवाई करण्याची योग्य भुमीका न बजावल्यास वंचित बहुजन आघाडीकडून आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जितेंद्र शिरसाठ, गौतम जाधव यांनी प्रशासनाला दिला.या मोर्चात नामदेव त्रिभुवन, अमोल दिवे, गौरव कसबे मनोज पठारे, बाबासाहेब वाघ, साहेबराव पडवळ, यशवंत पडवळ राजेंद्र पडवळ , लक्ष्मण धनेश्वर यांच्यासह शहर व ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. या मोर्चाला रिपब्लिकन पार्टी ऑफ आठवले गटाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, शहरप्रमुख श्रीकांत जाधव यांनी लेखी पत्र काढून पाठिंबा दिला.

# देऊळगाव गुजरी येथे विद्युततारा झाल्या जीवघेण्या

## महावितरणाचा भोंगळा कारभार मोठी दुर्घटना घडण्याची दाट शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**जामनेर :** देऊळगाव गुजरी हे मुख्य बाजारपेठेचे गाव असून या गावच्या बाजारपेठला परिसरातील बारा खेड्यांसह मोठमोठे गाव सुद्धा लागून असल्याने नेहमीप्रमाणे मोठमोठी अवजड वाहने कायम वापरत असतात. त्यातच मुख्य बाजारपेठमध्ये म्हणजे देऊळगाव गुजरी ते सावळद बारा रोडवर अनेक ठिकाणी विद्युत तारा जीर्ण व लोबकळत असून काही वाहनांना तारांचा स्पर्श होऊन कित्येक वेळा शॉर्टसर्किट झाल्याने गावातील विद्युत वीज पुरवठा दिवसभरातून अनेकदा बंद होत असतो. हा सर्व गैरप्रकार लक्षात घेऊन यावर काहीतरी मार्ग काढावा म्हणून देऊळगाव गुजरी बाजारपेठेतील सर्व व्यापारी बंधूंनी अनेकदा लाईनमन, इंजिनियर, तसेच फत्तेपूर सबस्टेशन, जामनेर सब स्टेशन यांना गावातील नागरिकांनी व व्यापारी बंधूंनी गेल्या एक ते दीड महिन्यापासून तोंडी व लेखी निवेदन देऊन कळवण्यात आलेले आहे. परंतु गेल्या



दीड महिन्यापासून फत्तेपुर सबस्टेशनचा भोंगळ कारभार तसेच अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा आणि नुसतीच एकमेकावर कोलवाकोलवी असा प्रकार सुरू असून मरणाला आमंत्रण देणाऱ्या विजेच्या तारांकडे कोणीही लक्ष द्यायला तयार नाही. जर या विद्युत तारांमुळे काही जीवितहानी घडली तर याला जबाबदार कोण वारंवार फोन करून तक्रार सांगूनही कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही. परंतु उडवा उडवीची व भूलथापा देणारी उत्तरे कर्मचारी व अभियंत्यांकडून देण्यात येत असून मुख्य बाजारपेठेतील विद्युत तारा जीर्ण होऊन लोंबकळल्याने मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे. काही दुर्घटना झाल्यास याला सर्वस्वी जबाबदार महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी राहतील कारण यांना वेळोवेळी तोंडी व लेखी तक्रार देऊनही काही जाड कातडीचे व दगडाचे सोंग घेऊन बसलेले अधिकारी त्यांची खुर्ची व जागा सोडायला तयार नाही कंपनी यांना फुकटचा पगार देते काय? अधिकारी कर्तव्यदक्ष असले तर असा भोंगळा कारभार होईलच कसा? असे अनेक प्रश्न व चर्चा जनतेच्या मुखातून निघत आहे. त्यामुळे वीज वितरण कंपनीने अशा ढिसाळ कारभाराकडे तात्काळ लक्ष देऊन जनतेसमोर असलेल्या समस्या ताबडतोब सोडण्याचा प्रयत्न करावा तसेच अधिकारी व कर्मचारी कर्तव्यदक्ष आहेत का? याकडे बारकाईने लक्ष ठेवावे अन्यथा पुढील होणाऱ्या प्रकारास वीज वितरण कंपनी व स्थानिक अधिकारी व कर्मचारी जबाबदार राहतील असाही संतप्त सवाल जनतेमधून केला आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर